


# गोदातीर समाचार


RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026
संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com






* वर्ष ६५ वे * अंक २२५ * नांदेड * सोमवार, दि. २४ ऑगस्ट २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211


# साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी सरकारचं मोठं पाऊल

## मिठाई विक्रेते ते बेकर्ससाठी नवीन नियमावली जारी

**मुंबई (प्रतिनिधी)** –सध्या सणासुदीचा काळ सुरू झाला आहे. या काळात साखरेच्या दरात मोठी वाढ झाली आहे. यामुळं ग्राहकांच्या खिशाला मोठी झळ बसत आहे. अशातच सरकारनं १० लाख टन साखर आयात करण्याचा देखील निर्णय घेतला आहे. साखरेच्या किंमती नियंत्रणात ठेवण्यासाठी सरकार विविध उपाययोजना करत आहे. सणासुदीच्या काळात साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी केंद्र सरकारने मोठ्या घाऊक ग्राहकांसाठी साठा मर्यादा कमी केली आहे. १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत व्यापाऱ्यांना केवळ १५ दिवसांचा साठा ठेवण्याची परवानगी देण्यात आली आहे.

जर तुम्ही मिठाई, बेकरी, बिस्किट, कन्फेक्शनरी किंवा शीतपेयांच्या व्यवसायात असाल, तर ही बातमी तुमच्यासाठी अत्यंत महत्त्वाची आहे. सणासुदीच्या दिवसांपूर्वी साखरेची साठेबाजी आणि वाढत्या किमतींना आळा घालण्यासाठी सरकारने एक मोठे पाऊल उचलले आहे. मोठ्या प्रमाणात साखरेचा वापर करणाऱ्या मोठ्या व्यवसायांना आता निर्धारित मर्यादेपलीकडे साखरेचा साठा करणे कठीण जाऊ शकते. नवीन नियमांनुसार, निर्धारित मर्यादेपलीकडे साखरेचा साठा केल्यास कारवाई होऊ शकते.

दरम्यान, सध्या सणासुदीचा काळ आहे. गणेश चतुर्थी, दसरा आणि दिवाळी यांसारख्या सणांमुळे ऑगस्ट ते नोव्हेंबर दरम्यान साखरेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते. या काळात, अनेक व्यवसाय अनेकदा आगाऊ मोठ्या प्रमाणात साखर खरेदी करून तिचा साठा करतात. हे लक्षात घेऊन, सरकारने मोठ्या खरेदीदारांसाठी साठा करण्याचा कालावधी १५ दिवसांपर्यंत कमी केला आहे. त्यामुळं १५ दिवस पुरेल एवढाच साठा करता येणार आहे.

नवीन आदेशानुसार, हा नियम १ सप्टेंबर ते ३० नोव्हेंबर २०२६ पर्यंत लागू राहील. हा नियम अशा व्यवसायांना किंवा संस्थांना लागू होईल ज्यांचा मासिक साखरेचा वापर १० मेट्रिक टन (१०० क्विंटल) (पान ६ वर...)

### खाण्याच्या अन् व्यवसायाच्या साखरेचे दर वेगळे ठेवा – बाबासाहेब पाटील

साखरेच्या दराबाबत राज्यसरकारकडून केंद्र सरकारला एक प्रस्ताव पाठवण्यात आला असून खाण्यासाठीच्या साखरेचा कोटा आणि व्यावसायिक वापरासाठीच्या साखरेचा कोटा वेगळा ठेवण्याची मागणी केली आहे. त्यानुसार खाण्यासाठी साखर दर कमी ठेवा आणि व्यावसायिक दर वेगळे ठेवा, अशी मागणी करण्यात आल्याचं सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सांगितलंय. दरम्यान, उसाची एफआरपीआणि साखरेची एमएसपी याची लिंक करायला लागेल, तरच कारखानदार टिकतील, ऊस उत्पादक शेतकऱ्यांना भाव मिळेल, असेही पाटील म्हणाले.

## तुकाराम मुंढेंच्या निर्णयाविरोधात व्यापारी न्यायालयात जाणार

**मुंबई (प्रतिनिधी)** – अन्न व औषध प्रशासन विभागाचे आयुक्त तुकाराम मुंढे यांनी आपला मोर्चा आता खाद्य तेलाकडे वळवला आहे. सुट्टे तेल विकू नका, घेऊ नका असे आदेश मुंढे यांनी दिले आहेत. दरम्यान, मुंढेंच्या या निर्णयाला काही व्यापाऱ्यांचा विरोध असल्याचं पाहायला मिळत आहे. नाशिकमध्ये तुकाराम मुंढेंच्या सुट्टे खाद्यतेल विक्री बंदी निर्णयाच्या विरोधात राज्यातील व्यापाऱ्यांची बैठक पार पडली. तुकाराम मुंढे यांच्या निर्णयाला व्यापारी न्यायालयात आव्हान देणार आहेत. याबाबत व्यापाऱ्यांनी राज्य सरकारला पंधरा दिवसांचा अल्टिमेटम दिला आहे.

रविवारी नाशिकमध्ये व्यापाऱ्यांची बैठक पार पडली. तुकाराम मुंढे यांनी सुट्टे खाद्यतेल विक्री बंदी निर्णयाला व्यापाऱ्यांनी विरोध केला आहे. हा निर्णय मागे न घेतल्यास राज्यभरातील व्यापारी रस्त्यावर उतरून आंदोलन करणार असल्याचा इशारा यावेळी देण्यात आला आहे.

# पृथ्वीचं तापमान वाढणार, आत्तापर्यंतचे सर्व विक्रम मोडणार!

**मुंबई (प्रतिनिधी)** –सध्या जगभरातील वातावरणात झपाट्यानं बदल होत असल्याचं चित्र पाहायला मिळत आहे. यावर्षी एल निनो सक्रिय झाल्यामुळं मोठ्या प्रमाणात पावसात तूट झाली आहे. अनेक भागात पावसानं दडी मारल्यामुळं पिण्याच्या पाण्याचा, शेतीच्या पाण्याचा मोठा प्रश्न निर्माण झाला आहे. दरम्यान, पॅसिफिक महासागरात तयार होणारी एल निनोची यावेळी अत्यंत शक्तिशाली असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे. शास्त्रज्ञांच्या अंदाजानुसार, याचा परिणाम जागतिक तापमान, पर्जन्यमान आणि हवामानावर होईल. यामुळं २०२६-२७ हे वर्ष उष्णतेचे नवीन विक्रम प्रस्थापित करण्याची शक्यता वर्तवली आहे,

यावर्षी जगाला पुन्हा एकदा मोठ्या उष्णतेच्या लाटेचा सामना करावा लागू शकतो. हवामानशास्त्रज्ञांच्या मते, पॅसिफिक महासागरात विकसित होणारी एल निनोची घटना यावेळी खूप तीव्र असू शकते, इतकी की ती १९ व्या शतकानंतरची सर्वात शक्तिशाली एल निनो घटना ठरु शकते. यामुळे जागतिक सरासरी तापमानात आणखी वाढ होऊ शकते, ज्यामुळे २०२६ किंवा २०२७ हे आतापर्यंतचे सर्वात उष्ण वर्ष ठरु शकते.

दरम्यान, एल निनोच्या परिस्थिती नेमकं काय होतं? असा सवाल देखील उपस्थित केला जात आहे. या काळात, पूर्व पॅसिफिक महासागरातील समुद्राचे पाणी सामान्यपेक्षा जास्त उष्ण होते. यावेळी, समुद्राच्या पृष्ठभागाचे तापमान सामान्यपेक्षा सुमारे ३ अंश सेल्सिअसने वाढण्याची शक्यता आहे. शास्त्रज्ञांच्या मते, एका सामान्य तीव्र एल निनोमुळे तापमानात साधारणपणे १ ते २ अंश सेल्सिअसने वाढ होते. एल निनो हे एक नैसर्गिक हवामान चक्र आहे जे दर काही वर्षांनी घडते. जेव्हा समुद्राचे पाणी गरम होते, तेव्हा ते वातावरणात अधिक उष्णता सोडते. यामुळे वाऱ्याच्या आणि पावसाच्या पद्धती बदलतात, ज्याचा परिणाम जगभरातील वेगवेगळ्या देशांमधील हवामानावर होतो.

### महाराष्ट्रात पाऊस पुन्हा बरसणार!

**मुंबई (प्रतिनिधी)** –संपूर्ण राज्याचे लक्ष लागून राहिलेल्या पावसाने पुन्हा एकदा महाराष्ट्राकडे मोर्चा वळवल्याचे चित्र आहे. बंगालच्या उपसागरात नव्याने कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याची शक्यता असल्याने राज्यातील काही भागांत पावसाला पोषक वातावरण तयार झाले आहे. त्यामुळे पावसाच्या स्थितीत पुन्हा बदल होण्याची शक्यता असून अनेक भागांत पावसाच्या सरी कोसळण्याचा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

## भारताची स्वदेशी एके-२०३ रायफलची यशस्वी निर्मिती

**नवी दिल्ली (प्रतिनिधी)** – स्वदेशी संरक्षण उत्पादनाच्या क्षेत्रात भारताने आणखी एक महत्त्वाचा टप्पा गाठला आहे. 'मेक इन इंडिया' उपक्रमांतर्गत अमेठीतील कोरवा आयुध निर्मिती प्रकल्पात पहिली १०० टक्के स्वदेशी एके-२०३ असॉल्ट रायफल यशस्वीपणे तयार करण्यात आली असून तिची प्राथमिक चाचणीही घेण्यात आली आहे. या रायफलला 'शेर' असे नाव देण्यात आले आहे.

एके-२०३ रायफल्सच्या स्थानिक उत्पादनासाठी भारत आणि रशियाने २०१९ मध्ये स्थापन केलेल्या इंडो-रशियन रायफल्स प्रायव्हेट लिमिटेडने ही कामगिरी केली आहे. खठठझड्चे उएज आणि चऊ मेजर जनरल एस. के. शर्मा यांनी याबाबत माहिती दिली. त्यांच्या म्हणण्यानुसार, 'शेर' रायफलमधील प्रत्येक घटक आणि कच्चा माल भारतीय उद्योगातूनच मिळवण्यात आला आहे.

# भुलेश्वरमध्ये २७ फूट उंच बाप्पाची मूर्ती कोसळली

## तरुण शिवसेना नेत्याचा दुर्दैवी मृत्यू, दोन चिमुरड्याही जखमी



**मुंबई (प्रतिनिधी)** – गणेशोत्सवाचे वेध लागलेल्या मुंबईत शनिवारी संध्याकाळच्या सुमारास अतिशय वेदनादायी आणि सुन्न करणारी घटना घडली. भुलेश्वरच्या राजाची २७ फूट उंच भव्य मूर्ती आगमनादरम्यान क्रेनवरून अचानक खाली कोसळली. या अपघातात दोन जण ठार झाले असून पाचजण जखमी झाले आहेत. जखमीमध्ये दोन लहान मुलींचा समावेश आहे.तर, 'भुलेश्वर राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळा'चे अध्यक्ष आणि शिवसेना नेते संकेत नेवशे (३३) तसेच पदाधिकारी बृजेश हेमंत जोशी (३०) यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण भुलेश्वर परिसरावर शोककळा पसरली आहे. तर, मुंबईतील गणेशोत्सव मंडळातही याचे पडसाद उमटले असून चिंता व्यक्त केली जात आहे.

भायखळ्यातील प्रसिद्ध मूर्तीकार अनिकेत देसाई यांच्या कार्यशाळेतून भुलेश्वरच्या राजाची मूर्ती शनिवारी संध्याकाळी अत्यंत उत्साहात आणि वाजत-गाजत मंडळाकडे निघाली होती. मंडळाचे ६३ वे वर्ष असल्याने कार्यकर्त्यांमध्ये मोठा उत्साह होता. मात्र, मूर्ती मंडपापासून अवघ्या ५० ते ६० फूट अंतरावर असलेल्या समुद्रीमाता मंदिराजवळ आली असताना ही दुर्घटना घडली. मूर्तीचा महाकाय भार तोलून धरणारी क्रेन अचानक कमजोर ठरली. त्यामुळे क्रेनच्या केबलमधून निसटून २७ फुटांची ही मूर्ती थेट खाली उपस्थित कार्यकर्त्यांच्या अंगावर कोसळली असल्याची माहिती समोर आली आहे.

### शिवसेना-भाजपमध्ये पुन्हा धुसफुस

# नांदेडचे पालकमंत्री बदलण्याची शिवसेनेची मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेडचे भाजपचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या कारभारावर शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. नांदेडमध्ये महायुतीतील शिवसेना आणि भाजपामध्ये वादाची ठिणगी पडण्याची शक्यता आहे. कारण शिवसेनेच्या पदाधिकाऱ्यांनी नांदेड जिल्ह्याचा पालकमंत्री बदलण्याची मागणी जलसंधारण मंत्री संजय राठोड यांच्याकडे केली आहे.



पालकमंत्री अतुल सावे हे शिवसेना पदाधिकारी व कार्यकर्त्यांना योग्य आणि सन्मानाची वागणूक देत नाहीत. शिवसेनेने मागणी केलेल्या नागरी आणि ग्रामीण विकासाच्या कामांकडे दुर्लक्ष केले जात आहे. विकास निधीच्या वाटपात शिवसेनेवर अन्याय होत असून, भाजपला जास्त निधी दिला जात आहे. तर दुसरीकडे विविध शासकीय समित्या, प्राधिकरणे आणि जबाबदाऱ्यांमध्ये शिवसेनेच्या कार्यकर्त्यांना योग्य प्रतिनिधित्व दिले जात नाही, अशी नाराजी प्रारंभीपासून आहे. याच पार्श्वभूमीवर नांदेड दौऱ्यावर आलेले मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड यांची भेट घेऊन शिवसेनेच्या शहरप्रमुखांसह स्थानिक पदाधिकाऱ्यांनी थेट निवेदन सादर केले. भाजपचे पालकमंत्री अतुल सावे यांना हटवून नांदेड जिल्ह्याला शिवसेनेचा पालकमंत्री देण्यात यावा, अशी मागणी त्यांनी केली.

शिवसेना पदाधिकाऱ्यांची गाऱ्हाणी ऐकून घेतल्यानंतर मंत्री संजय राठोड म्हणाले, कोणत्या जिल्ह्याला कोणाची पालकमंत्री म्हणून नियुक्ती करायची, हा अंतिम अधिकार राज्याच्या मुख्यमंत्र्यांचा असतो. नांदेडमधील शिवसेना पदाधिकाऱ्यांनी ज्या भावना आणि तक्रारी मांडल्या आहेत, त्याबाबत पक्षाचे मुख्य नेते आणि मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याशी चर्चा केली जाईल.

दरम्यान, नांदेडमध्ये आधीपासूनच स्थानिक पातळीवर भाजप आणि शिवसेनेत अंतर्गत स्पर्धा पाहायला मिळत आहे. आता थेट जाहीरपणे पालकमंत्री बदलाची मागणी केल्यामुळे जिल्ह्यातील महायुतीतील वाद चव्हाट्यावर आला असून, वरिष्ठ नेत्यांना यावर मध्यस्थी करावी लागणार आहे.

# शाळा दत्तक घ्या, दर आठवड्याला आढावा घ्या; एकनाथ शिंदेंचे आमदार-खासदारांना आवाहन

**मुंबई (प्रतिनिधी)** –उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी शनिवारी मुंबईतील नंदनवन बंगल्यावर शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे तसेच शिक्षण विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्यांसोबत तब्बल चार तास बैठक घेऊन राज्यातील शिक्षण क्षेत्राचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी विभागाच्या विविध उपक्रमांची, योजनांची आणि आतापर्यंत झालेल्या प्रगतीची माहिती वरिष्ठ अधिकाऱ्यांनी एकनाथ शिंदे यांना दिली. शिक्षण मंत्रालयाकडून सुरू असलेल्या चांगल्या कामाचे कौतुक करताना एकनाथ शिंदे यांनी शिक्षण विभागाने आता मिशन मोडवर काम करून हे चांगले काम राज्यातील प्रत्येक शाळेपर्यंत आणि विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवावे, असे निर्देश दिले.

राज्यातील शाळांचे आधुनिकीकरण आणि शिक्षण व्यवस्थेत प्रत्यक्ष, दृश्यमान आणि गुणवत्तापूर्ण बदल घडवून आणण्यासाठी स्पष्ट, सर्वसमावेशक आणि कालबद्ध कृती आराखडा तयार करण्याचे निर्देश एकनाथ शिंदेंनी दिले. आपल्या मुलांच्या आकांक्षा बदलत आहेत, त्यांची स्वप्ने बदलत आहेत. त्यानुसार आपल्या शाळाही बदलल्या पाहिजेत. महाराष्ट्रातील प्रत्येक मुलाला भविष्यातील संधी आणि आव्हानांसाठी तयार करणारी आधुनिक, गुणवत्तापूर्ण आणि भविष्यवेधी शिक्षणव्यवस्था आपण निर्माण केली पाहिजे, असे एकनाथ शिंदे यांनी सांगितले. या कृती आराखड्यात शिक्षण क्षेत्रातील तज्ज्ञ आणि अनुभवी शिक्षकांना सोबत घेणे, शिक्षकांसाठी प्रशिक्षण, प्रोत्साहन आणि प्रेरणादायी उपक्रम राबवणे तसेच उत्कृष्ट काम करणाऱ्या शिक्षकांना प्रोत्साहन व योग्य सन्मान देणे, यावर विशेष भर देण्यात येणार आहे. केंद्र सरकारच्या विविध शिक्षणविषयक योजनांची महाराष्ट्रात प्रभावी आणि गतिमान अंमलबजावणी करण्याच्या सूचनाही एकनाथ शिंदे यांनी दिल्या.

## गावापासून जिल्हा रुग्णालयापर्यंत 'मानकांनुसार आरोग्यसेवा'

**मुंबई (प्रतिनिधी)** –राज्यातील नागरिकांना त्यांच्या गरजेनुसार दर्जेदार, सुलभ आणि वेळेत आरोग्यसेवा उपलब्ध करून देण्यासाठी सार्वजनिक आरोग्य विभागाने रुग्णालयनिहाय आरोग्यसेवांची सर्व-समावेशक मानके निश्चित केली आहेत. ग्रामीण रुग्णालयापासून उपजिल्हा, सामान्य आणि जिल्हा रुग्णालयापर्यंत कोणत्या स्तरावर कोणत्या आरोग्य सुविधा, तज्ज्ञ डॉक्टर, तपासण्या, मनुष्यबळ, औषधे आणि पूरक सेवा उपलब्ध असाव्यात, याची स्पष्ट रूपरेषा निश्चित करण्यात आल्याची माहिती सार्वजनिक आरोग्य मंत्री प्रकाश आबिटकर यांनी दिली.

# नांदेडमध्ये आणखी एका शिक्षकाची आत्महत्या

## समायोजनाच्या कारणावरून संस्थाचालक आणि जि.प.ने केली होती टोलवाटोलवी

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड शहरातील एका शिक्षकाने मृत्यूला कवटाळले आहे. खाजगी संस्थेतील विद्यार्थी संख्या कमी झाल्याने अतिरिक्त ठरलेल्या या शिक्षकाचे समायोजन अन्य ठिकाणी करण्यात आले होते. इतर ठिकाणी न पाठवता याच शाळेत आपल्याला राहू द्यावे, अशी विनंती त्याने जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे केली होती. मात्र संस्था चालकाने जागाच नाही तर ठेवायचे कसे असे म्हणून रुजू करून घेण्यास नकार दिला होता. त्यामुळे नैराश्यात आलेल्या या ४२ वर्षीय शिक्षकाने विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या केली. या आत्महत्यानंतर पुन्हा एकदा शिक्षण विभाग चर्चेत आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, नांदेडमधील वामननगर परिसरात असलेल्या 'ब्ल्यू बेल्स' च्या इमारतीमध्ये चालत असलेल्या रवींद्र प्राथमिक शाळेत कार्यरत असलेले राजकुमार नागोराव धोंगडे हे शिक्षक गेल्या काही दिवसापासून समायोजनाच्या प्रश्नामुळे वैफल्यग्रस्त झाले होते. त्याच्या खाजगी शाळेतील विद्यार्थी संख्या कमी झाल्यामुळे त्यांना अतिरिक्त ठरवण्यात आले होते. त्यामुळे जिल्हा परिषदेने त्यांचे समायोजन इतर शाळेत केले होते; मात्र ते इतर ठिकाणी जाण्यास इच्छुक नव्हते. त्यांनी नांदेड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाकडे विनंती अर्ज करून आपल्याला पुन्हा रविंद्र प्रार्थमिक शाळेत ठेवावे, अशी विनंती केली होती. या विनंती अर्जावरून त्यांचे समायोजन नांदेड जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने पुन्हा एकदा रवींद्र प्राथमिक शाळेत केले; मात्र संस्थाचालकाने येथे जागाच नाही तर आम्ही पगार कशी करायची, त्यांना ठेवायचे कसे असे अनेक प्रश्न उपस्थित करून रुजू करून घेण्याबाबत नापसंती दर्शवली होती. याच कारणावरून शिक्षण संस्थाचालक आणि शिक्षक राजकुमार धोंगडे यांच्यामध्ये खटके उडाले होते. या सर्व प्रकारामुळे वैफल्यग्रस्त झालेल्या राजकुमार यांनी रविवारी विषारी द्रव्य प्राशन करून आपले जीवन संपविले. धोंगडे यांच्या आत्महत्येच्या नेमक्या कारणाचा तपास भाग्यनगर पोलीस करत आहेत. शवविच्छेदनानंतर धोंगडे यांचे पार्थिव त्यांच्या मूळ गावी नायगाव तालुक्यात नेले आहे. तक्रारीसाठी अद्याप कोणीही पोलीस ठाण्यात न आल्याने या संदर्भाने कोणताही गुन्हा अद्याप दाखल झाला नसल्याची माहिती भाग्यनगर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक संतोष तांबे यांनी दिली. (पान ६ वर...)






# एटीएम दरोड्याचा कट फसला, 'युपी'च्या टोळीतील २ आरोपी जाळ्यात; शिवाजीनगर पोलिसांची तत्परता

**नांदेड (प्रतिनिधी)**– जिल्ह्यातील मालमत्तेविरुद्ध घडणाऱ्या गुन्ह्यांना प्रतिबंध व उघडकीस आणण्यासाठी पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने विशेष मोहीम राबविण्यात येत आहे. त्याच अनुषंगाने नांदेड शहरातील वसंतराव नाईक पुतळ्याच्या पाठीमागील मोकळ्या जागेत एटीएम फोडून दरोडा टाकण्याच्या तयारीत असलेल्या पाच आरोपींना शिवाजीनगर गुन्हे शोध पथकाने तात्काळ कारवाई करून ताब्यात घेतले. पोलिसांच्या सतर्कतेमुळे संभाव्य गंभीर गुन्हा घडण्यापूर्वीच तो रोखण्यात यश आले.

दिनांक २२ ऑगस्ट २०२६ रोजी दुपारच्या सुमारास एका गोपनीय बातमीदाराकडून शिवाजीनगर ठाण्याचे पोलीस निरीक्षक राजेश पुरी यांना मिळाली, त्यावरून त्यांनी आपल्या गुन्हे शोध पथकाला खात्रीशीर माहिती दिली की, वसंतराव नाईक यांच्या पुतळ्याच्या पाठीमागील मोकळ्या जागेत




एका मेहंदी रंगाच्या टाटा नेक्सॉन गाडीमध्ये पाचजण बसले असून, ते नाईक पुतळ्याजवळील एटीएम मशीन फोडून दरोडा टाकण्याच्या तयारीत आहेत.

माहिती मिळताच पोलिसांनी तात्काळ दोन पंचांना पाचारण करून विमानतळ पोलिसांची मदत घेत नमूद ठिकाणी धाव घेतली. तेथे पाच संशयित इसम आपापसात काहीतरी बोलताना दिसले. पोलिसांनी कोणताही संशय येऊ न देता त्यांच्या दिशेने जाण्याचा प्रयत्न केला असता, पोलिसांना पाहताच ते पाचहीजण पळून जाऊ लागले. पोलीस पथकाने तात्काळ त्यांचा पाठलाग करून त्यातील दोन जणांना जागीच शिताफीने पकडून ताब्यात घेतले. मात्र, उर्वरित तीनजण मेहंदी रंगाच्या टाटा नेक्सॉन गाडीमध्ये बसून घटनास्थळावरून पळून जाण्यात यशस्वी झाले.

ताब्यात घेतलेल्या दोन्ही आरोपींची विचारपूस व पंचांसमक्ष अंगझडती घेतली असता आरोपी संजय साहू शिवअवतार साहू (वय १९ वर्षे) व आदित्य राजसिंह सज्जनसिंह (वय २१ वर्षे,) दोघे रा. सिकाटीया, पोस्ट पूर्वामी, जि. कानपूर, उत्तर प्रदेश यांच्या अंगझडतीतून एकूण १ हजार ५० रुपये रोख, २ मोबाईल, हातोडा, स्क्रूड्रायव्हर व मिरची पूड असा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पोलिसांनी दोन्ही आरोपींना विश्वासात घेऊन कसून चौकशी केली असता, त्यांनी सांगितले की, आम्ही रविवारी रात्री नाईक पुतळ्याजवळील एटीएम फोडून त्यातील रोख रक्कम चोरून नेणार होतो; त्यासाठीच आम्ही या परिसराची रेकी (पाहणी) करण्यासाठी आलो होतो. तसेच टाटा नेक्सॉन गाडीतून पळून गेलेल्या तीन साथीदारांबद्दल विचारले असता त्यांनी त्यांची नावे शिवबरण सिंग उर्फ सिबू ठाकूर कुंवर बहादूरसिंग, विश्वजित सिंग उर्फ सिप्पी ठाकूर सरणामसिंग, देवेंद्रसिंग ठाकूर (तिघेही रा. पुराईहार, जि. कानपूर, उत्तर प्रदेश) अशी सांगितली. पळून गेलेल्या गाडीमध्ये चाकू व दोरी (रस्सी) असल्याचेही ताब्यातील आरोपींनी सांगितले. फरार आरोपींचा शोध सुरू आहे.




**जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे**
**शहाणे करूनी सोडावे, सकळ जन**

संस्थापक संपादकः
कै. देविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

**संपादक**
**केशव घोणसे पाटील**

# चिमुकल्यांच्या आरोग्याशी खेळ कधी थांबणार?

अंगणवाडी ही केवळ बालकांना शिक्षणाची प्राथमिक ओळख करून देणारी व्यवस्था नाही, तर त्यांच्या पोषणाची आणि आरोग्याचीही महत्त्वाची जबाबदारी पार पाडणारे केंद्र आहे. याच ठिकाणी बालमनांवर कळत नकळत संस्कार देखील केले जातात. ग्रामीण आणि दुर्गम भागातील गरीब कुटुंबांतील चिमुकल्यांसाठी अंगणवाडीतील पोषण आहार हा त्यांच्या दैनंदिन आहारातील महत्त्वाचा आधार असतो. त्यामुळे या आहाराच्या गुणवत्तेशी कोणतीही तडजोड म्हणजे थेट बालकांच्या आरोग्याशी खेळ आहे. आंबेगाव येथील अंगणवाडी सेविकेने निकृष्ट दर्जाच्या अन्नपदार्थांच्या पुरवठ्याबाबत समाज माध्यमावर व्हीडीओ प्रसिद्ध केला. यामुळे तिच्यावर निलंबनाची कारवाई झाल्याची बाब समोर आली आहे. या घटनेने अनेक गंभीर प्रश्न उपस्थित केले आहेत. निकृष्ट अन्नपुरवठ्याबाबत आवाज उठवणाऱ्या कर्मचाऱ्यावरच कारवाई होत असेल, तर गैरप्रकारांविरोधात तक्रार कोण करणार? पुरवठा करणाऱ्या कंत्राटदाराच्या मालाचा दर्जा तपासण्याची जबाबदारी कोणाची? संबंधित अधिकाऱ्यांनी आपली कर्तव्ये पार पाडली आहेत की केवळ कागदोपत्री तपासण्या करून जबाबदारी झटकली आहे? किंवा ते मॅनेज झाले आहेत का? या प्रश्नांची उत्तरे प्रशासनाने जनतेसमोर स्पष्टपणे मांडणे आवश्यक आहे. अंगणवाड्यांसाठी शासनाकडून मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध करून दिला जातो. या निधीतून बालकांना पौष्टिक आणि दर्जेदार आहार मिळावा, हा त्यामागचा मूलभूत उद्देश आहे. मात्र, जर निकृष्ट दर्जाचा माल पुरवून त्यातून कंत्राटदार आणि संबंधित अधिकारी आपले खिसे भरत असतील, अशी परिस्थिती निर्माण झाली असेल, तर हा केवळ भ्रष्टाचाराचा विषय राहत नाही; तो सामाजिक आणि मानवी संवेदनशीलतेचा प्रश्न बनतो. कारण या गैरप्रकाराची किंमत कोणाला मोजावी लागते? ती मोजतात ती निरपराध चिमुकली मुले, यांचा आवाज कधीच कोणीही ऐकत नाही. कुपोषणाशी लढण्यासाठी शासन विविध योजना राबवत असताना दुसरीकडे पोषण आहारच निकृष्ट मिळत असेल, तर योजनांच्या उद्देशालाच हरताळ फासला जातो. लहान मुलांच्या शरीराची वाढ आणि मेंदूचा विकास या वयात झपाट्याने होत असतो. अशा काळात दर्जाहीन अथवा दूषित अन्नामुळे त्यांच्या आरोग्यावर गंभीर परिणाम होऊ शकतात. त्यामुळे अन्नाच्या गुणवत्तेतील निष्काळजीपणा हा क्षम्य ठरू शकत नाही. ही समस्या केवळ अंगणवाड्यांपुरती मर्यादित नाही. आश्रमशाळांमध्येही विद्यार्थ्यांना दिल्या जाणाऱ्या खाद्यपदार्थांमध्ये अळ्या, झुरळे किंवा इतर घाण आढळल्याच्या घटना यापूर्वी अनेकदा समोर आल्या आहेत. एखाद्या ठिकाणी अशी घटना घडली की काही दिवस गदारोळ होतो, चौकशीचे आदेश दिले जातात किंवा तसे नाटक केले जाते आणि नंतर प्रकरण शांत होते. मात्र, मूळ व्यवस्था बदलत नाही. परिणामी अशा घटना पुन्हा-पुन्हा घडत राहतात. अन्न व औषध प्रशासन विभागाची भूमिका येथे अत्यंत महत्त्वाची आहे. अन्नाची गुणवत्ता तपासणे, नमुने घेणे, दोषी पुरवठादारांवर कारवाई करणे आणि नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कठोर दंडात्मक पावले उचलणे, ही जबाबदारी प्रभावीपणे पार पडली पाहिजे. केवळ कंत्राटदाराला नोटीस बजावून किंवा चौकशी समिती नेमून भागणार नाही. हल्ली तर चौकशी समिती नेमणे म्हणजे प्रकरण लांबवणे आणि नंतर ते दाबून टाकणे यासाठीचा हा एक कायदेशीर मार्ग ठरला आहे का अशी शंका येते. निकृष्ट अन्नपुरवठा सिद्ध झाल्यास संबंधित कंत्राटदारासोबतच त्यावर देखरेख ठेवण्याची जबाबदारी असलेल्या अधिकाऱ्यांचीही जबाबदारी निश्चित झाली पाहिजे. कारण असे अधिकारी आणि कंत्राटदार यांच्यामध्ये आर्थिक संबंध असतात. याचबरोबर तक्रार करणाऱ्या अंगणवाडी सेविकेला निलंबित करण्यामागची कारणेही पारदर्शकपणे स्पष्ट झाली पाहिजेत. तिने नियमांचे उल्लंघन केले असेल तर त्याची चौकशी व्हावी; परंतु केवळ निकृष्ट अन्नाबाबत आवाज उठवल्यामुळे तिच्यावर कारवाई झाली असेल, तर हा प्रकार अत्यंत गंभीर आहे. गैरप्रकार उघड करणाऱ्या कर्मचाऱ्यांचे संरक्षण करण्याऐवजी त्यांनाच लक्ष्य केले गेले, तर भविष्यात कोणीही तक्रार करण्याचे धाडस करणार नाही किंबहुना असे करू नये हीच प्रशासनाची इच्छा असावी. बालकांच्या ताटातील अन्न हे कोणाच्याही कमाईचे साधन नसून त्यांच्या हक्काचे पोषण आहे. त्यामुळे या प्रकरणाची निष्पक्ष चौकशी करून सत्य जनतेसमोर आणणे, दोषींवर कठोर कारवाई करणे आणि अंगणवाडी तसेच आश्रमशाळांमधील अन्नाच्या गुणवत्तेची नियमित व स्वतंत्र तपासणी व्यवस्था निर्माण करणे गरजेचे आहे. कारण शासनाच्या योजनांमध्ये पैसा खर्च होणे पुरेसे नाही; त्या पैशातून लाभार्थ्यांना प्रत्यक्षात दर्जेदार सेवा मिळते का, हे पाहणे अधिक महत्त्वाचे आहे. चिमुकल्यांच्या आरोग्याशी तडजोड करणाऱ्यांना पाठीशी घातले गेले, तर समाजाने अशा व्यवस्थेला कधीच माफ करू नये. मुलांच्या ताटातील अन्नात भ्रष्टाचाराला जागा नसावी. चिमुकल्यांच्या आरोग्याशी सुरू असलेला हा खेळ आता थांबायलाच हवा.

# शहीद राजगुरू महान क्रांतिकारक

महाराष्ट्रातील पुणे येथील खेड गावांमध्ये (आताचे राजगुरू नगर) २४ ऑगस्ट १९०८ रोजी शिवराम हरी राजगुरू नावाचा महान क्रांतिकारक जन्माला आला. जनुकाय या पृथ्वीवर लखलखत्या सूर्यप्रकाशाचा जन्म झाला की काय असे सर्वांना भासू लागले. कारण जन्मतःच त्यांच्या चेहऱ्यावर क्रांतीची ज्वाला धगधगत होती आणि भारताच्या स्वातंत्र्य लढ्यात एक तेजोमय लखलखता प्रकाश प्रगट झाला व क्रांतीची मशाल संपूर्ण भारतात सूर्याप्रमाणे प्रज्वलीत झाली. राजगुरूंनी संस्कृत भाषेत शिक्षण घेतले. लघुसिध्दांत कौमुदीचा अभ्यास केला. त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी आणि कन्नड भाषा चांगलीच अवगत होती. क्रांतिकारी विचार-सरणीचे चंद्रशेखर आझाद आणि लोकमान्य टिळक यांच्या विचारांच्या प्रभावामुळे अल्पवयातच राजगुरू इंग्रजाची घृणा करू लागले व स्वतंत्र लढ्यात उडी घेतली.



राजगुरू हिंदुस्थान सोशालिस्ट रिपब्लिकन असोसिएशनचे सदस्य होते. यानंतर चंद्रशेखर आझाद, भगतसिंग, सुखदेव थापर घनिष्ठ मित्र झाले आणि क्रांतीला नवी दिशा व चालना देवून क्रांतीची ज्वाला प्रज्वलित केली. आज शहिदांच्या पुण्याईनेच देशाची १४५ कोटी जनता मोकळा श्वास घेत आहे. अनेक क्रांतिकारक, थोर पुरुष यांच्या अथक परिश्रमाने, प्रयत्नाने व बलिदानाने १५ ऑगस्ट १९४७ ला भारत स्वतंत्र झाला. क्रांतिकारकांनी कोणत्याही गोष्टीची व आपल्या परिवाराची पर्वा न करता इंग्रजांना सडेतोड उत्तर देऊन स्वतंत्र भारताची मशाल १९४७ ला प्रज्वलीत केली. १९२८ ला भारतातील घडामोडींचा अभ्यास करण्यासाठी इंग्लंडहून सायमन कमिशन नावाचे शिष्टमंडळ भारतात आले. त्यावेळी सायमन कमिशन नावाचे वादळ रोखण्यासाठी लाला लजपतराय यांनी पुढाकार घेऊन 'सायमन परत जा'च्या घोषणांनी संपूर्ण भारत एकवटला. ही बाब सायमन कमिशनचे अधिकारी सँडर्स यांना पचली नाही. लाला लजपतराय यांच्या नेतृत्वाखाली लाखोंच्या संख्येने प्रदर्शनकारी जमा झाले. यामुळे सायमन कमिशनची घाबरगुंडी उडाली व जमाव पांगवण्यासाठी सँडर्स यांनी लाठीचार्जचा आदेश दिला. यात लाला लजपतराय घायाळ झाले आणि त्यातच १७ डिसेंबर १९२८ ला त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या मृत्यूमुळे संपूर्ण भारत शोकाकुल झाला. हे दु:ख राजगुरू, भगतसिंह आणि सुखदेव यांना पहावले नाही. त्यामुळे क्रांतिकारकांच्या तळपायाची आग मस्तकात गेली आणि लाला लजपतराय यांच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी क्रांतिकारकांनी कंबर कसली व लाला लजपतराय यांच्या मृत्यूला कारणीभूत असणारा अधिकारी सँडर्स याला ठार मारण्याची योजना आखली.

लाला लजपतराय यांच्या पहिल्या मासिक श्राध्दाच्या दिवशी राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव हे तिघेही वेश बदलून जॉन सँडर्स यांच्या निवासस्थानी गेले. सँडर्स दिसताच सुखदेव यांनी संकेत दिले. संकेत मिळताच भगतसिंग आणि राजगुरू यांनी एकाचवेळी गोळ्या झाडून सँडर्सला जागीच ठार केले व तेथून पलायन केले. इंग्रजांनी तिघांना पकडण्यासाठी शर्थीचे प्रयत्न सुरू केले. बरेच दिवस इंग्रजांना हुलकावणी देत तिन्ही क्रांतिकारक भूमिगत राहिले. परंतु फितुरीमुळे ते पकडले गेले. शेवटी २३ मार्च १९३१ ला भारतमातेच्या तिन्ही सुपुत्रांना इंग्रजांनी फाशी दिली. यामुळे संपूर्ण भारत स्तब्ध होऊन सर्वत्र शोककळा पसरली. भारत स्वातंत्र्यासाठी आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या या तिन्ही सुपुत्रांना कोन्हीही विसरणार नाही. जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत या शहिदांना कोन्हिही विसरणार नाही.

राजगुरू, भगतसिंग आणि सुखदेव यांचे बलिदान पाहून १४५ कोटी जनतेच्या तळपायाची आग आजही मस्तकात जाते. परंतु ९५ टक्के राजकीय पुढारी शहिदांना विसरल्याचे दिसून येते.कारण ९५ टक्के राजकीय पुढारी आज देशाच्या विकासापेक्षा स्वत:च्या विकासाकडे जास्त लक्ष देताना दिसतात. इंग्रजांनी भारताला लुटले ही बाब सत्य आहे.परंतु देशातील भ्रष्ट राजकीय पुढाऱ्यांनी देशाला हजारोपटीने लुटले आहे त्यामुळे देशात अनेक गंभीर समस्या निर्माण झालेल्या दिसून येतात हे स्वतंत्र भारताचे दुर्भाग्य म्हणावे लागेल.

देशातील वाढत्या भ्रष्टाचारामुळे अशी परिस्थिती निर्माण झाली आहे की श्रीमंत हा दिवसेंदिवस श्रीमंत होत आहे व गरीब हा गरिबीच्या खाईत गुदमरत आहे. या संपूर्ण बाबींची जाण राजकीय पुढाऱ्यांनी ठेवली पाहिजे व देशसेवा आणि जनसेवा याकडे सर्वांनीच लक्ष केंद्रित केले पाहिजे तेव्हाच राजकीय पुढाऱ्यांची शहीदांना खरी श्रद्धांजली मानल्या जाईल. राजकीय पुढाऱ्यांनी फक्त एक दिवस शहिदांचे अनुकरण करून लोकप्रतिनिधी, जनप्रतिनिधी या पदाला कलंकित न करता यांचा योग्य उपयोग करून जनसेवा केली पाहिजे. तेंव्हाच शहीद राजगुरू यांना खरी श्रद्धांजली ठरेल.

संपूर्ण देश शहिदांना आदरांजली अर्पण करीत आहे.परंतु शहिदांचे बलिदान व्यर्थ जाणार नाही याची जाण मुख्यत्वेकरुन राजकीय पुढाऱ्यांनी ठेवण्याची गरज आहे. कारण राजकीय पुढाऱ्यांचे लक्ष देशसेवेपेक्षा फक्त स्वतःचे हित साधण्याच्या प्रयत्नात असते ही देशातील जनता उघड्या डोळ्यांनी पाहत आहे. त्यामुळे सावधान, राजकीय पुढाऱ्यांनो, कोणतेही कार्य करताना शहिदांचे अनुकरण अवश्य करावे व त्यांच्या बलिदानाला कोठेही ठेच पोहचणार नाही किंवा तडा जाणार नाही याची दक्षता घ्यावी. हे भारत मातेच्या शहिद भुमि पुत्रांनो माझा कोटी कोटी प्रणाम! देशात बदलत्या हवामानामुळे,जंगल तोडीमुळे व वाढत्या अलनिनोच्या प्रभावामुळे निसर्गाचे संतुलन डगमगले आहे याला संतुलित करण्यासाठी शहीद राजगुरू यांच्या जयंतीचे औचित्य साधून प्रत्येकांनी वृक्षलागवड केली पाहिजे. मुख्यत्वेकरून राजकीय पुढारी, सरकार, प्रशासन, शाळा-महाविद्यालये, स्थानिक प्रशासन व सामाजिक संस्था यांनी राजगुरू यांच्या जयंतीनिमित्त आठवण म्हणून मोठ्या प्रमाणात वृक्षारोपण करावे. यामुळे संपूर्ण सृष्टी प्रफुल्लित राहण्यास मदत होईल व प्रत्येक झाडांच्या पानांत, फुलात, फळात आपल्याला शहीद राजगुरूसह संपूर्ण शहिदांचे अवश्य दर्शन होईल. जब तक सुरज चांद रहेंगा तबतक शहिदोंका नाम रहेंगा शहीद राजगुरू यांना कोटी कोटी प्रणाम.

**-रमेश कृष्णराव लांजेवार**
नागपूर.
मो. ९९२१६९०७७९

# महिला शेतकरी: शेतीच्या कणाकणात योगदान, तरीही हक्कांपासून वंचित



संयुक्त राष्ट्र संघाने महिलांचे कृषी आणि बागायती क्षेत्रातील योगदान अधोरेखित करण्यासाठी तसेच लैंगिक असमानता दूर करण्याच्या उद्देशाने २०२६ हे वर्ष 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून साजरे करण्याचे घोषित केले आहे. हा निर्णय केवळ महिलांच्या कष्टांची दखल घेणारा नाही, तर शेतीच्या संपूर्ण व्यवस्थेकडे नव्या दृष्टीने पाहण्याची संधीही देणारा आहे. २०११ च्या जनगणनेनुसार, भारताच्या एकूण लोकसंख्येत महिलांचे प्रमाण ४८.४ टक्के आहे. मात्र, शेती आणि बागायती क्षेत्रातील त्यांचा सहभाग यापेक्षा कितीतरी अधिक आहे. ग्रामीण महिला घरातील जबाबदाऱ्या सांभाळत शेतीच्या कामात मोठ्या प्रमाणावर योगदान देतात. बागायतीशी संबंधित कामांमध्ये त्यांचा सहभाग सुमारे ७९ टक्के, तर शेतीतील कामांमध्ये जवळपास ७५ टक्के असल्याचे विविध आकडेवारीतून दिसून येते. तरीही 'शेतकरी' म्हटले की आपल्या डोळ्यांसमोर प्रामुख्याने पुरुषाचेच चित्र उभे राहते. शेतात राबणारी, पिकांची निगा राखणारी आणि घराचा संसारही सांभाळणारी महिला मात्र 'शेतकरी' या ओळखीपासून दूर राहते. हीच आपल्या कृषी व्यवस्थेतील मोठी विसंगती आहे.

उदारीकरण, खासगीकरण आणि औद्योगिकी-करणानंतर ग्रामीण भागातून पुरुषांचे शहरांकडे स्थलांतर वाढले. परिणामी, शेतीची जबाबदारी मोठ्या प्रमाणावर महिलांच्या खांद्यावर आली. घर, मुलांचे संगोपन आणि कुटुंबाच्या जबाबदाऱ्या पार पाडतानाच त्या शेतीतही मेहनत करू लागल्या. आज शेतीमध्ये मोठ्या प्रमाणा-वर यांत्रिकीकरण झाले असले, तरी भात लागवड, पेरणी, खुरपणी, कापणी, मळणी, साठवणूक, प्रक्रिया आणि चारा उत्पादन यांसारख्या श्रमप्रधान कामांमध्ये महिलांचा सहभाग मोठा आहे. पशुपालन, मत्स्यपालन आणि बागायती क्षेत्रातही महिलांची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. २०२३-२४ च्या आवधिक श्रमशक्ती सर्वेक्षणानुसार, ग्रामीण भागातील प्रत्येक तीन महिलांपैकी सुमारे दोन महिला कृषी समुदायाशी संबंधित आहेत. उत्तर प्रदेश आणि बिहारसारख्या राज्यांत तर जवळपास ८० टक्के महिला शेतीशी निगडित असल्याचे दिसून येते. लोकसभेत सादर करण्यात आलेल्या माहितीनुसार, महिला कृषी काम गारांची संख्या वाढत असताना पुरुष कृषी कामगारांच्या संख्येत घट होत आहे.

महिला शेतकऱ्यांच्या हक्कांचा प्रश्न भारतापुरता मर्यादित नाही. जगभरातील कृषी क्षेत्रात महिलांचे मोठे योगदान असूनही जमिनीच्या मालकीमध्ये त्यांना समान स्थान मिळालेले नाही. विकसनशील देशांमध्ये मोठा लोकसंख्या वर्ग शेतीशी संबंधित असताना जमिनीच्या मालकीमध्ये महिलांचा वाटा अत्यल्प आहे. त्यामुळे कृषी क्षेत्रातील लैंगिक असमानता ही जागतिक समस्या बनली आहे. भारतातही खसरा, खतौनी किंवा इतर महसूल अभिलेखांमध्ये महिलांचे नाव नसल्यामुळे त्यांना कृषी क्षेत्रातील निर्णय प्रक्रियेत अपेक्षित स्थान मिळत नाही. परिणामी, उत्पादन, कर्ज, बाजारपेठ, तंत्रज्ञान आणि सरकारी योजनांशी संबंधित निर्णयांमध्ये त्यांचा आवाज दुबळा राहतो.

भारतीय संविधानातील अनुच्छेद १४ समानतेचा अधिकार देतो. त्यामुळे समान कामासाठी महिलांना समान वेतन मिळणे अपेक्षित आहे. मात्र, प्रत्यक्ष कृषी मजुरीच्या क्षेत्रात महिलांना अनेकदा पुरुषांपेक्षा कमी मोबदला मिळतो. त्याचप्रमाणे अनुच्छेद २१ सन्मानाने जगण्याचा अधिकार देतो. कृषी क्षेत्र मोठ्या प्रमाणावर असंघटित असल्याने महिलांच्या सुरक्षिततेचा प्रश्नही गंभीर आहे. कार्यस्थळी लैंगिक छळापासून संरक्षण देणाऱ्या २०१३ च्या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी ग्रामीण आणि असंघटित कृषी क्षेत्रात अनेकदा दिसून येत नाही. यामुळे शेतात काम करणाऱ्या महिलांना लैंगिक छळ, हिंसा-चार आणि शोषणाला सामोरे जावे लागू शकते. न्याय मिळवण्यासाठी त्यांना अनेक अडथळे पार करावे लागतात. त्यामुळे कायद्याने दिलेले समानता आणि सन्मानाचे अधिकार प्रत्यक्ष जीवनात पोहोचणे अत्यावश्यक आहे.

महिला शेतकऱ्यांच्या सक्षमीकरणासाठी विविध पातळ्यांवर प्रयत्न सुरू आहेत. भारतीय कृषी संशोधन परिषद (खउठ) ने १९९६ मध्ये भुवनेश्वर येथे केंद्रीय महिला कृषी संस्था स्थापन केली. महिलांच्या गरजा लक्षात घेऊन कृषी तंत्रज्ञान विकसित करणे आणि त्यांच्या उपजीविकेशी संबंधित संशोधन करणे हा त्यामागील महत्त्वाचा उद्देश आहे. स्वयं-सहायता बचत गटांनी ग्रामीण महिलांच्या आर्थिक सहभागाला मोठी चालना दिली आहे. 'नमो ड्रोन दीदी' योजनेमुळे महिला आधुनिक कृषी तंत्रज्ञानाशी जोडल्या जात आहेत, तर 'लखपती दीदी' उपक्रमातून महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचा प्रयत्न केला जात आहे. राष्ट्रीय अन्न सुरक्षा अभियान, नाबार्ड आणि राष्ट्रीय कृषी विस्तार व्यवस्थापन संस्थेच्या सहकार्याने राबविण्यात येणाऱ्या 'ॲग्री क्लिनिक आणि ॲग्री बिझनेस सेंटर' योजनेतून महिला कृषी उद्योजकतेला संधी मिळत आहे. कृषी पायाभूत सुविधा निधीसह इतर योजनाही कार्यरत आहेत. मात्र, योजनांची संख्या वाढण्याबरोबरच त्यांचा लाभ प्रत्यक्ष महिला शेतकऱ्यांपर्यंत पोहोचतो आहे का, याचे मूल्यमापन होणेही तितकेच महत्त्वाचे आहे.

महिला रात्रंदिवस शेतात राबत असतील, तर त्यांना 'शेतकरी' म्हणून अधिकृत ओळखही मिळायला हवी. जमिनीचा मालकी हक्क, महसूल अभिलेखातील नोंद, संस्थात्मक कर्ज, विमा, अनुदान, कृषी तंत्रज्ञान, बाजारपेठ आणि निर्णय प्रक्रियेत महिलांचा समान सहभाग सुनिश्चित करणे ही काळाची गरज आहे. यासाठी सरकार, खासगी संस्था आणि समाज या तिन्ही घटकांनी एकत्रितपणे ठोस धोरणे आखण्याची आवश्यकता आहे. महिलांना केवळ शेतीतील मजूर म्हणून नव्हे, तर शेतीच्या निर्णय प्रक्रियेतील स्वतंत्र आणि सक्षम भागीदार म्हणून मान्यता द्यावी लागेल. महिला शेतकऱ्यांना औपचारिक कृषी शिक्षण, कौशल्य विकास, डिजिटल आणि आर्थिक साक्षरता, आधुनिक तंत्रज्ञान तसेच बाजारपेठेचे ज्ञान मिळाले, तर त्यांच्या योगदानाचे आर्थिक मूल्यही वाढेल.

महिला शेतकरी सक्षम झाल्या, तर केवळ त्यांचे कुटुंब नव्हे, तर देशाची कृषी अर्थव्यवस्था, पोषणसुरक्षा आणि ग्रामीण विकासही अधिक मजबूत होईल. २०२६ हे 'आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष' म्हणून साजरे करण्याचा खरा अर्थ केवळ कार्यक्रम आणि घोषणांमध्ये नाही. ज्या हातांनी देशाची शेती टिकवली, त्या हातांना मालकी, समान वेतन, सुरक्षितता, सन्मान आणि निर्णयाचा अधिकार देणेहीच महिला शेतकरी वर्षाची खरी फलश्रुती ठरेल.

**-मच्छिंद्र ऐनापुरे,**
जत जि. सांगली

# अजरामर कवियत्री बहिणाबाई चौधरी



मराठी साहित्यातील अजरामर कवयित्री बहिणाबाई चौधरी यांची आज जयंती. बहिणाबाई चौधरी यांचा जन्म २४ ऑगस्ट १८८० रोजी जळगाव जवळील असोदे या गावी झाला. त्यावेळेच्या परंपरेनुसार वयाच्या अवघ्या तेराव्या वर्षी त्यांचा विवाह झाला. दुर्दैवाने तरुणपणीच त्यांना वैधव्य आले. सुरवातीचे एकत्र कुटुंब विभक्त झाल्यावर आणि नवऱ्याच्या निधनानंतर त्यांचे जीवन हलाखीत गेले. पण त्याही परिस्थितीत त्यांनी आपली कन्या काशी आणि पुत्र सोपानदेव व ओंकार यांच्यावर चांगले संस्कार केले.

बहिणाबाई या कधीही शाळेत गेल्या नाही. त्यांना लिहिता-वाचता येत नव्हते त्यामुळे त्यांनी केलेल्या अनेक कविता काळाच्या ओघात नष्ट झाल्या. त्या निरीक्षर होत्या. मात्र त्यांना कवितेची निसर्गदत्त देणगी लाभली होती. घरातील आणि शेतातील कामे करता करता त्यांना काव्य सुचले आणि ते काव्य मराठी साहित्य विश्वात अजरामर ठरले. बहिणाबाई शेतात गेल्या की शेतीवर उत्स्फुर्त कविता म्हणत. घरकाम करतानाही त्यांना कविता सुचत. घरकाम करता करता त्या कविता गुणगुणत तसेच जात्यावर दळताना विविध प्रकारच्या ओव्या म्हणत. त्यांनी अशा हजारो कविता केल्या आहेत. मात्र आज त्या सर्व कविता उपलब्ध नाहीत.

बहिणाबाईंचे चिरंजीव सोपानदेव शाळेत जाऊ लागल्यावर ते बहिणाबाईंच्या कविता आपल्या वहीत लिहून घेऊ लागले. याकामी त्यांना त्यांचे मावसभाऊ पितांबर चौधरी हे मदत करत. बहिणाबाई काम करताना जेंव्हा कविता म्हणत तेंव्हा सोपानदेव त्या कविता आपल्या वहीत लिहून घेत असत. त्यांचे चिरंजीव सोपानदेव चौधरी हेही पुढे महाराष्ट्रातील नामवंत कवी म्हणून नावारूपास आले.

१९५२ साली आचार्य अत्र्यांनी स्वतः लिहिलेल्या प्रस्तावनेसह बहिणाबाईंच्या ३५ कविता असलेला काव्यसंग्रह प्रसिद्ध केला. आचार्य अत्र्यांमुळेच या महान कवयित्रीचा महाराष्ट्राला परिचय झाला. पुढे बहिणाबाईंच्या अनेक कविता प्रसिद्ध झाल्या. लोकप्रिय झाल्या. संपूर्ण महाराष्ट्राला बहिणाबाईंच्या काव्य प्रतिभेने भुरळ घातली. प्रत्येकाला ती आपली कविता वाटली. बहिणाबाईंच्या सर्व कविता त्यांच्या मातृभाषेत म्हणजे वऱ्हाडी - अहिराणी-खानदेशी भाषेत आहेत. त्यांच्या कवितेचा विषय सासर-माहेर, संसार, शेतीची कामे, निसर्ग, पशुपक्षी, मराठी सण - उत्सव, भाऊ, बहीण, आई, वडील असे होते. या साऱ्यांबद्दल त्यांच्या मनात विलक्षण आत्मीयता होती. हीच आत्मीयता कवितेतून झळकत होती. तल्लख स्मरणशक्ती, सूक्ष्म निरीक्षण, उपजत विनोदबुद्धी, जीवनातील सुख दुःखाकडे समभावाने पाहू शकणारे शहाणपण आणि जगण्यातून कळलेले तत्वज्ञान ही त्यांच्या काव्य प्रतिभेची वैशिष्ट्य होती.

शालेय अभ्यासक्रमात त्यांच्या अनेक कविता समाविष्ट करण्यात आल्या आहेत. अरे संसार संसार जसा तवा चुल्यावर आधी हाताला चटके तेंव्हा (मियते) मिळते भाकर..., खोप्यामधी खोपा सुगरणीचा चांगला, देखा पिलासाठी तिने जीव झाडाले टांगला..., मन वढाय वढाय उभ्या पिकांतलं ढोर किती हाकला हाकला तरी येतं पिकांवर...धरित्रीले दंडवत...यासारख्या त्यांच्या कितीतरी कविता शालेय अभ्यासक्रमात समाविष्ट आहेत. या कविता न अभ्यासलेला एकही व्यक्ती महाराष्ट्रात सापडणार नाही. शाळेत जाणाऱ्या सर्व मुलांच्या या कविता तोंडपाठ आहेत. महाविद्यालयातही त्यांच्या अनेक कविता अभ्यासण्यासाठी आहेत.

महाराष्ट्रातील अनेक पिढ्यांनी या कवितांचे पारायण केले आहेत. बहिणाबाईंच्या कवितांनी महाराष्ट्राच्या अनेक पिढ्यांना भुरळ घातली आहे. महाराष्ट्राच्या साहित्य विश्वात बहिणाबाई चौधरी व त्यांच्या कविता अजरामर आहेत. मराठी साहित्य विश्वातील त्यांचे स्थान ध्रुव तात्यासारखे अढळ आहे म्हणूनच महाराष्ट्र शासनाने जळगावच्या उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाचे नाव कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ असे ठेवले आहे. जी व्यक्ती कधीही शाळेत गेली नाही त्या व्यक्तीचे नाव विद्यापीठाला दिले जाते यातूनच बहिणाबाईंचे श्रेष्ठत्व सिद्ध होते. आपल्या काव्य प्रतिभेने मराठी साहित्याला वेगळ्या उंचीवर नेणाऱ्या या महान कवयित्रीचे ३ डिसेंबर १९५१ रोजी निधन झाले. आज त्यांची १४३ वी जयंती आहे. जयंतीदिनी बहिणाबाई चौधरी यांना विनम्र अभिवादन!

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# डॉ. कर्मवीर पोषटीदादा उणग्रतवार यांची चार दशकांची अविरत रुग्णसेवा

नांदेड जिल्ह्यासह आंध्र प्रदेशातील रुग्णांच्या मनात आपुलकीचे स्थान निर्माण करणारे, अचूक निदान, योग्य उपचार आणि रुग्णांशी जिव्हाळ्याने संवाद साधण्याची कला अवगत अस-लेले डॉ. कर्मवीर पोषटीदादा उणग्रतवार हे गेल्या सुमारे चार दशकांपासून वैद्यकीय क्षेत्रात रुग्णसेवा करीत आहेत. नांदेड शहरा-तील डॉक्टर लाईन परिसरात त्यांच्या नावाने कार्यरत असलेल्या कर्मवीर हॉस्पिटलच्या माध्यमातून त्यांनी हजारो रुग्णांना उपचार आणि मानसिक आधार दिला आहे.



वैद्यकीय क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवामुळे मेंदूविकार, हृदयरोग तसेच विविध आजारांच्या रुग्णांचे अचूक निदान व उपचार करण्यासाठी त्यांची ख्याती निर्माण झाली आहे. विशेष म्हणजे तेलुगू भाषिक रुग्णांशी त्यांच्या मातृभाषेत आपुलकीने संवाद साधून रुग्णांची योग्य विचारपूस करणे, आजाराची माहिती समजून घेणे आणि त्यानुसार उपचार करण्याची त्यांची पद्धत रुग्णांना विशेष भावते. अनेक रुग्णांच्या मते, डॉक्टरांच्या गोड वाणीतील दोन आधाराचे शब्दच आजारावरील अर्धा उपचार ठरतात.

'रुग्णसेवा हीच खरी ईश्वरसेवा' हा विचार त्यांनी आपल्या कार्यातून जपला आहे. त्यांच्या व्यक्तिमत्त्वावर त्यांचे वडील, ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक कै. पोषटीदादा उणग्रतवार यांच्या समाजसेवेचा मोठा प्रभाव आहे. स्वातंत्र्यानंतर देगलूरसारख्या दुर्गम भागातील गरीब आणि वंचित मुलांना शिक्षणाची संधी मिळावी, या उदात्त हेतूने त्यांनी देगलूर महाविद्यालयाच्या उभारणीत मोलाची भूमिका बजावली. शेवटच्या क्षणापर्यंत समाजासाठी कार्य करणारे आणि माणसातच देव शोधणारे असे त्यांचे व्यक्तिमत्त्व होते.

नांदेड जिल्हा आणि आंध्र प्रदेशातील असंख्य रुग्णांच्या मनात विश्वासाचे स्थान निर्माण करणाऱ्या या कर्मयोगी डॉक्टरांच्या कार्याला सलाम! त्यांच्या हातून अशीच अखंड रुग्णसेवा आणि समाजसेवा घडत राहो, त्यांना निरोगी, आनंदी आणि दीर्घायुष्य लाभो, हीच ईश्वरचरणी प्रार्थना.

**-करणसिंह ठाकूर,**
सिडको, नांदेड

# फूड सेफ्टी प्रमाणपत्राची सक्ती शाळांवर नको; पुरोगामी शिक्षक संघटनेची शासनाकडे मागणी

**नांदेड (प्रतिनिधी)** –राज्यातील शाळांमध्ये शालेय पोषण आहार योजना सुरू आहे. यामध्ये धान्य पुरवणारी व शिजवणारी यंत्रणा वेगळी आहे. मात्र अन्न सुरक्षा व मानक प्राधिकरणाचा परवाना अथवा नोंदणी शाळा मुख्याध्यापक यांच्या वैयक्तिक अथवा शाळेच्या नावाने करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. तेव्हा सदर सक्ती शाळांना न करता, योजनेची प्रशासकीय व कायदेशीर जबाबदारी शासन, अन्न शिजवणारी यंत्रणा अथवा अधिकृत अन्नपुरवठादार यांच्यावर करण्यात यावी, या मागणीचे निवेदन महाराष्ट्र पुरोगामी प्राथमिक शिक्षक समितीच्या वतीने राज्याध्यक्ष प्रसाद पाटील, राज्य सरचिटणीस हरीश ससनकर यांनी शासनाला पाठवले आहे.

राज्यातील शासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच अनुदानित शाळांमध्ये कार्यरत शिक्षक व मुख्याध्यापक हे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेसोबत शासनाच्या विविध विद्यार्थी कल्याणकारी योजना प्रामाणिकपणे राबवित आहेत. शालेय पोषण आहार योजना ही विद्यार्थ्यांच्या आरोग्य, पोषण व शाळेतील उपस्थितीसाठी अत्यंत महत्त्वाची योजना आहे. या योजनेचे पूर्णपणे समर्थन आहे, मात्र तिची अंमलबजावणी करताना शिक्षक व मुख्याध्यापकांवर त्यांच्या मूळ शैक्षणिक जबाबदाऱ्यांशी विसंगत अशी वैयक्तिक कायदेशीर जबाबदारी टाकली जाऊ नये, ही संघटनेची रास्त मागणी आहे.

मात्र या निर्णयामुळे पोषण आहार, अन्नपदार्थ व शिजवण्यामध्ये प्रत्यक्ष सहभाग नसलेल्या शाळेच्या मुख्याध्यापकांना त्यांच्या वैयक्तिक नावाने "Food Business Operator' म्हणून नोंदणी करून, शासनाच्या योजनेतील अन्नाची गुणवत्ता, कच्च्या मालाचा पुरवठा, स्वयंपाक, पाणी, स्वच्छता, अन्नाची तपासणी, साठवणूक व वितरण या संपूर्ण साखळीची वैयक्तिक कायदेशीर जबाबदारी देण्यात येणार आहे, जे योग्य ठरणार नाही.

मुख्याध्यापक हे मूलतः शैक्षणिक व प्रशासकीय अधिकारी आहेत. ते अन्न उत्पादक, अन्न प्रक्रिया व्यावसायिक, कंत्राटदार किंवा अन्न पुरवठा करणारे व्यापारी नाहीत व शाळा ही स्वतंत्र संस्था नाही. शासनाच्या योजनेअंतर्गत धान्य, डाळी, तेल, मसाले व इतर साहित्य कोणत्या पुरवठादाराकडून येते, त्याची निर्मिती अथवा खरेदी कुठे होते, त्याची प्रयोगशाळा तपासणी कशी होते आणि पुरवठ्याच्या आधी त्याची गुणवत्ता कोण तपासते, या बाबींवर मुख्याध्यापकांचे प्रत्यक्ष नियंत्रण नसते.

तरीही जर मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक नावाने अन्न सुरक्षा नोंदणी परवाना करण्यात आला, तर भविष्यात अन्नाच्या गुणवत्तेबाबत कोणतीही तक्रार, तपासणी, नमुना अपयशी ठरणे किंवा विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी संबंधित घटना घडल्यास मुख्याध्यापकांना चौकशी, नोटीस अथवा इतर कायदेशीर प्रक्रियेला सामोरे जावे लागू शकते. FSSI अंतर्गत असुरक्षित अन्न, स्वच्छतेतील त्रुटी आणि इतर उल्लंघनांसाठी दंडात्मक तरतुदी आहेत. त्यामुळे अशा योजनेची जबाबदारी मुख्याध्यापकांच्या वैयक्तिक नावावर टाकल्यास त्यांच्यावर प्रशासकीय, आर्थिक व कायदेशीर कामाचा अतिरिक्त भार वाढत जाईल. याचा थेट परिणाम त्यांच्या आरोग्यावर व विद्यार्थ्यांच्या अध्यापनावर होण्याची शक्यता आहे. त्यामुळे सदर नोंदणी धान्य पुरवठादार व आहार शिजवणारी यंत्रणा यांना करण्याचे आदेशित व्हावे, या मागणीचे निवेदन शालेय शिक्षण मंत्री, प्रधान सचिव, शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक यांना पुरोगामी शिक्षक संघटनेच्या वतीने पाठवण्यात आले आहे, अशी माहिती राज्य कोषाध्यक्ष जी. एस. मंगनाळे यांनी कळविली आहे.

## नांदेड जिल्हा कराटे संघ निवड चाचणी आयोजन

**नांदेड (प्रतिनिधी)** –महाराष्ट्र कराटे असोसिएशन राज्य संघटनेच्या वतीने आयोजित ४७ वी महाराष्ट्र राज्यस्तरीय कराटे स्पर्धा दि. ९ ते ११ ऑक्टोबर २०२६ दरम्यान अंधेरी स्पोर्ट्स कॉम्प्लेक्स, मुंबई येथे होणार आहे.

या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी नांदेड जिल्ह्याचा अधिकृत कराटे संघ निवडण्यासाठी वीर कराटे-दो असोसिएशन ऑफ नांदेड, तालुका व जिल्हा नांदेड यांच्या वतीने जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन करण्यात आले आहे. ही निवड चाचणी रविवार, दि. ३० ऑगस्ट २०२६ रोजी सकाळी ११ वाजता घेण्यात येणार आहे. निवड चाचणीचे ठिकाण इतोसू-र्यु कराटे-डो इंडिया, नांदेड जिल्हा कराटे प्रशिक्षण केंद्र, छत्रपती चौक, बायपास रोड, आर.एम.आर. बिल्डिंग, दुसरा मजला, नांदेड हे आहे.

नांदेड जिल्ह्यातील जास्तीत-जास्त कराटे खेळाडूंनी या निवड चाचणीत सहभागी होऊन आपली गुणवत्ता सिद्ध करावी, असे आवाहन वीर कराटे-दो असोसिएशन ऑफ नांदेड, तालुका व जिल्हा संघटनेचे सचिव संदीप व्ही. जाधव यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी रवी बकवाड व विशाल कांबळे यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# बारड येथे मोफत मधुमेह व नेत्र तपासणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

### ११५ जणांची नेत्र तपासणी; १३ जणांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा सल्ला
### १३० जणांच्या मधुमेह तपासणीत ६० जण मधुमेहग्रस्त आढळले




**नांदेड (प्रतिनिधी)** – लायन्स क्लब नांदेड मिडटाउन, डिस्ट्रिक्ट ३२३४ एच-२, लायन्स नांदेड मिडटाउन डायबेटीस केअर सेंटर यांच्या संयुक्त विद्यमाने बारड येथे मोफत मधुमेह व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. विठ्ठल मंदिर संस्थान, मेन रोड, बारड येथे झालेल्या या आरोग्य शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

शिबिरात एकूण ११५ जणांची नेत्र तपासणी करण्यात आली. तपासणीअंती १३ जणांना मोतीबिंदू असल्याचे निदर्शनास आले असून, त्यांना मोतीबिंदू शस्त्रक्रियेचा सल्ला देण्यात आला. तपासणीमध्ये निष्पन्न झालेल्या रुग्णांना त्यांच्या इच्छेनुसार येत्या महिनाभरात लायन्स नेत्र रुग्णालयात मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करून घेण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहे. त्यामुळे आर्थिक अडचणीमुळे उपचारापासून वंचित राहणाऱ्या गरजू रुग्णांना मोठा दिलासा मिळणार आहे. यासोबतच १३० जणांची मधुमेह तपासणी करण्यात आली. यामध्ये ६० जणांना मधुमेह असल्याचे आढळून आले. संबंधितांना प्राथमिक औषधोपचार देऊन मधुमेह नियंत्रणासाठी आवश्यक आहार-विहार, नियमित तपासणी आणि पुढील वैद्यकीय उपचाराबाबत मार्गदर्शन करण्यात आले. मधुमेहाकडे दुर्लक्ष न करता वेळोवेळी रक्तातील साखरेची तपासणी करून तज्ज्ञांचा सल्ला घेण्याचे आवाहनही करण्यात आले.

या शिबिरात मधुमेहासोबतच थायरॉईडविषयक लक्षणांबाबतही नागरिकांना मार्गदर्शन करण्यात आले. आरोग्य तपासणीच्या माध्यमातून आजारांचे वेळीच निदान होऊन योग्य उपचार मिळावेत, हा या उपक्रमाचा प्रमुख उद्देश होता. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी लायन्स क्लब ऑफ नांदेड मिडटाऊनचे अध्यक्ष सरताज सिंघ कंधारवाले, सचिव विनायक चव्हाण, कोषाध्यक्ष केदार मालपाणी, माजी सरपंच बाळासाहेब बारडकर, बंडू आमदूरकर, डॉ. बी. जी. कळने, क्षेत्रीय अध्यक्ष लॉ. मनीष माकन, लॉयन्स नांदेड मिडटाऊन डायबिटीक फाउंडेशनचे अध्यक्ष लॉ. शिरिष कासलीवाल, लॉ. सतीश सामते, लॉ. रिमा माकन, प्रकल्प संचालक लॉ. मनप्रीतकौर कंधारवाले, लॉ. विना चव्हाण यांनी मोलाचे सहकार्य केले.

या आरोग्य शिबिरास श्री बाळासाहेब देशमुख मित्र मंडळ यांचे सौजन्य लाभले. तसेच लायन्स नेत्र रुग्णालय, गंगावाडी, नांदेड आणि डॉक्टर असोसिएशन बारड यांच्या सहकार्याने शिबीर यशस्वीरीत्या पार पडले. ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावातच मोफत आरोग्य तपासणीची सुविधा उपलब्ध करून देत, निदान झालेल्या रुग्णांना पुढील उपचाराची दिशा देण्याचा हा उपक्रम सामाजिक बांधिलकीचे उत्तम उदाहरण ठरला. विशेषतः मोतीबिंदू निदान झालेल्या रुग्णांना पुढील महिनाभरात इच्छेनुसार मोफत शस्त्रक्रियेची सुविधा उपलब्ध करून देण्यात येत असल्याने या उपक्रमाचे नागरिकांनी कौतुक केले.

# महात्मा फुले, अण्णाभाऊ साठे व वामनदादा कर्डक जयंतीनिमित्त रक्तदान शिबीर व अन्नदान संपन्न

### रयत सेवाभावी संस्थेचा सामाजिक उपक्रम; युवक व नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग




**नवीन नांदेड (प्रतिनिधी)** – क्रांतीसूर्य महात्मा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त, लोकशाहीर साहित्यरत्न डॉ. अण्णाभाऊ साठे व महाकवी लोकशाहीर वामनदादा कर्डक यांच्या १०४ व्या जयंतीनिमित्त तसेच भारतीय स्वातंत्र्य दिनानिमित्त रयत सेवाभावी संस्था, सुजलेगाव यांच्या वतीने रक्तदान शिबीर व अन्नदान कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला नागरिकांनी उत्तम प्रतिसाद दिला.

रक्तदान शिबिरासाठी डॉ. शंकरराव चव्हाण वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या वतीने रक्तसंकलन पथक उपस्थित होते. पथकप्रमुख डॉ. धनश्री केंद्रे यांच्या नेतृत्वाखाली वैद्यकीय पथकाने रक्त संकलनाची प्रक्रिया सुरक्षितपणे पार पाडली. सामाजिक बांधिलकी जपत अनेक रक्तदात्यांनी स्वेच्छेने रक्तदान करून या उपक्रमाला प्रतिसाद दिला. कार्यक्रमास आंबेडकरवादी मिशनचे प्रमुख दीपक कदम यांनी उपस्थित राहून रक्तदाते, आयोजक व कार्यकर्त्यांना शुभेच्छा दिल्या.

यावेळी रक्तदानाचे महत्त्व अधोरेखित करत, रक्तदानामुळे गरजू रुग्णांचे प्राण वाचविण्यास मदत होते आणि समाजात मानवतेची भावना अधिक दृढ होते, असे प्रतिपादन दीपक कदम यांनी केले.

या उपक्रमाचे आयोजन प्रा. इरवंत सूर्यकार, रयत सेवाभावी संस्थेच्या पुढाकाराने करण्यात आले. यावेळी प्रकाश कांबळे (भीमवाडीकर), चंद्रकांत मेटकर मांजरमकर, सपना भीमराव टोमके, सक्षम सूर्यकार यांच्यासह सामाजिक कार्यकर्ते, युवक, रक्तदाते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

रक्तदान शिबिरासोबतच उपस्थित नागरिक व सहभागींसाठी अन्नदानाचे आयोजन करण्यात आले होते. महापुरुषांच्या विचारांना अभिवादन करत सामाजिक सेवा, मानवता आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. रक्तदान करा, जीवन वाचवा, समाज सेवेत सहभागी व्हा, या संदेशाने कार्यक्रमाची उत्साहापूर्ण वातावरणात सांगता झाली.

## डॉ. एम. ए. गफार यांचे निधन



**नांदेड (प्रतिनिधी)**– वजिराबाद येथील प्रसिद्ध सर्जन डॉ. एम. ए. गफार यांचे रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी निधन झाले आहे. त्यांची अंत्ययात्रा वजिराबाद येथील त्यांच्या घरून सकाळी १० वाजता निघणार असून, अंत्यसंस्कार (दफन विधी) सोमवार, दि. २४ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता कर्बला येथील कब्रस्तानात होणार आहेत.

## गोविंदराव कल्याणकर यांचे निधन



**अर्धापूर (प्रतिनिधी)**– तालुक्यातील सांगवी येथील ज्येष्ठ नागरिक गोविंदराव विठ्ठलराव कल्याणकर (वय ७०) यांचे शनिवार, दि. २२ ऑगस्ट रात्री अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्या पार्थिवावर सांगवी ता. अर्धापूर येथील स्मशानभूमीत रविवार, दि. २३ ऑगस्ट रोजी दुपारी अंत्यसंस्कार करण्यात आले.

गोविंदराव कल्याणकर यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, एक मुलगी, सुना-नातवंडे असा परिवार आहे. ते भाजपाचे कार्यकर्ते राजू कल्याणकर यांचे वडील होत.

# आर्य समाजातर्फे ९ ते ११ सप्टेंबर दरम्यान श्रावणी वेदप्रचार महोत्सव

**नांदेड (प्रतिनिधी)** –आर्य समाज नांदेडच्या वतीने श्रावणी वेदप्रचार मासानिमित्त तीन दिवसीय श्रावणी वेदप्रचार महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे. हा महोत्सव ९ ते ११ सप्टेंबर २०२६ दरम्यान जुना मोंढा परिसरातील आर्य समाज मंदिरात होणार आहे.

महोत्सवात यज्ञ, वैदिक प्रवचने, ज्ञानयज्ञ, महिला संमेलन तसेच शंका-समाधान अशा विविध धार्मिक व प्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या महोत्सवासाठी प्रयागराज (उत्तर प्रदेश) येथील वैदिक विद्वान व व्याख्याते डॉ. आशर्फीलाल शास्त्री हे प्रमुख वक्ते म्हणून उपस्थित राहणार आहेत. तसेच एटा (उत्तर प्रदेश) येथील भजनोपदेशक पं. शिवपाल आर्य हे भजन व उपदेशाच्या माध्यमातून उपस्थितांना मार्गदर्शन करणार आहेत.

महोत्सवाच्या कालावधीत दररोज सकाळी ८ ते १० आणि सायंकाळी ६ ते ८ या वेळेत ज्ञानयज्ञ, व्याख्याने व प्रवचनांचे आयोजन करण्यात आले आहे. या वैदिक ज्ञान व प्रबोधनाच्या पर्वात नागरिकांनी सहकुटुंब सहभागी होऊन महोत्सवाचा लाभ घ्यावा, असे आवाहन आर्य समाज नांदेडच्या अध्यक्षा श्रीमती जी. व्ही. मारमपल्ले, अॅड. ओम ऋतुध्वज कदम, कोषाध्यक्ष यादव भांगे, उपप्रधान अभय कुलकर्णी, उपमंत्री धोंडीबा सुरावार, व्यवस्थापक गजानन डोके यांच्यासह सर्व मार्गदर्शक व सदस्यांनी केले आहे.

# कै. वसंतराव चव्हाण यांच्या स्मृतिदिनानिमित्त २६ ऑगस्टला नायगावात कीर्तन सोहळा



**नायगाव बाजार (प्रतिनिधी)** – लोकनेते तथा माजी खासदार कै. वसंतराव बळवंतराव चव्हाण यांच्या द्वितीय पुण्यस्मरणानिमित्त नायगाव येथे बुधवार, दि. २६ ऑगस्ट रोजी कीर्तन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सकाळी ९ वाजता समाधीपूजन, तर १० ते १२ या वेळेत वसंत स्मृती कृषी महाविद्यालयाच्या लालवंडी रोड परिसरात हा कार्यक्रम होणार आहे.

प्रसिद्ध कीर्तनकार युवाकीर्तीवीर ह.भ.प. ज्ञानेश्वर माऊली पठाडे यांचे हरिनाम कीर्तन यावेळी होणार असून, त्यातून अध्यात्मासोबत सामाजिक प्रबोधनाचा संदेश दिला जाणार आहे. कीर्तनानंतर महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. दरम्यान, कार्यक्रमाच्या पूर्वतयारीसाठी खासदार रविंद्र वसंतराव चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली बैठक झाली. भाविकांची मोठी उपस्थिती अपेक्षित असल्याने आसनव्यवस्था, पार्किंग, स्वागत व भोजनासाठी विविध समित्या गठित करण्यात आल्या. बैठकीत बोलताना खासदार चव्हाण यांनी, चव्हाण परिवार म्हणजे सर्व नायगावकर हा कार्यक्रम प्रत्येकाने आपला समजून यशस्वी करावा, असे आवाहन केले.

यावेळी हनमंतराव चव्हाण, माधवअप्पा बेळगे, विजय पाटील चव्हाण, नारायण जाधव, बाबासाहेब शिंदे, उद्योजक साईनाथ चिद्रावार, पत्रकार बाळासाहेब पांडे यांच्यासह विविध क्षेत्रातील मान्यवर, व्यापारी, नगरसेवक व चव्हाण मित्र मंडळाचे पदाधिकारी उपस्थित होते. कै. वसंतराव चव्हाण यांच्या कार्यावर आधारित चित्रफितही कार्यक्रमात दाखविण्यात येणार असल्याची माहिती संचालक बालाजी शिंदे यांनी दिली.

## किनवट येथील नळकांडी पुलामध्ये अनोळखी इसमाचा मृतदेह आढळला

**किनवट (प्रतिनिधी)** –इस्लापूर ते कोसमेट रस्त्यावरील मुख्य चौकातील नळकांडी पुलाखाली शनिवार, दि. २२ रोजी सकाळी दहाच्या सुमारास एका ३२ वर्षीय तरुणाचा मृतदेह आढळून आल्याने एकच खळबळ उडाली.

कोसमेट - निर्मल हायवे रोड लगत असलेल्या जिजाऊ चौकाजवळील कृषी कार्यालयासमोरील नळकांडी पुलामध्ये पुलाच्या मध्य भागात तरुणाचा मृतदेह आढळून आला. सदरील तरुण हा वाळकी येथील असल्याचा प्राथमिक अंदाज ग्रामस्थातून व्यक्त केला जात आहे. सदरील घटना सकाळी दहा वाजता उघडकीस आली असतानाही सायंकाळी चार वाजेपर्यंत या मृतदेहास शवविच्छेदनासाठी आरोग्य केंद्रात आणले नसल्याची माहिती समोर येत आहे.

# महिला महाविद्यालय येथे सखी उद्योजिका महोत्सव संपन्न



**नांदेड (प्रतिनिधी)** – केआरएम महिला महाविद्यालय नांदेड येथील वाणिज्य विभागाच्या वतीने विद्यार्थिनींच्या कल्पनाशक्ती, कौशल्य आणि उद्योजकतेला प्रोत्साहन देण्यासाठी 'के.आर.एम. सखी उद्योजिका महोत्सव २०२६' चे आयोजन करण्यात आले होते. या महोत्सवाचे उद्घाटन प्राचार्य डॉ. उज्ज्वला सदावर्ते यांच्या हस्ते करण्यात आले.

या कार्यक्रमास मार्गदर्शक म्हणून प्रा. डॉ. ललिता येडपलवार आणि अध्यक्षस्थानी महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. विजया देशमुख तसेच प्रमुख अतिथी म्हणून कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य व्यंकटी वाघमारे यांची उपस्थिती होती.

विद्यार्थिनींच्या कल्पना, कौशल्य आणि उद्योजकतेचा उत्सव या संकल्पनेवर आधारित या महोत्सवात विद्यार्थिनींनी विविध खाद्यपदार्थ, रांगोळी, डेकोरेशन, हस्तकला, बांगड्या, विविध कलाकुसरीच्या वस्तू आदींचे आकर्षक स्टॉल्स उभारले होते. विद्यार्थिनींना प्रत्यक्ष व्यवसायाचा अनुभव मिळावा, त्यांच्यामध्ये आत्मविश्वास व स्वावलंबनाची भावना निर्माण व्हावी आणि भविष्यातील उद्योजकतेची प्रेरणा मिळावी व त्या अर्थसाक्षर व्हाव्यात या उद्देशाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी थोडक्यात भाषणे करून विद्यार्थिनींचे मनोबल वाढविले आणि त्यांना सहभागी प्रमाणपत्राचे वाटप करण्यात आले.

कार्यक्रमाच्या यशस्वी नियोजनासाठी वाणिज्य शाखेतील डॉ. अनुजा मॅडम, डॉ. उदयपालसिंघ लिखारी, प्रा. सीमा शिंदे आणि प्रा. दीपिका मालपानी, हरदीपसिंघ जमदार यांनी विशेष परिश्रम घेतले.

यावेळी प्रा. एम. जी. बोरगावकर, प्रा. डॉ. व्यंकटी पावडे, डॉ. एम. आर. धर्मापुरीकर, बी. आर. पवार, डॉ. एस. जे. इंगळे, प्रा. शेख हुमा कौसर, डॉ. कुलकर्णी एस. एम., डॉ. बी. डी. गुंजलवाड, डॉ. के. एस. पाटील, डॉ. एम. एन. पवार, प्रदीप जाधव, मारोती शितळे, प्रा. सुनीता कामळजकर, ज्ञानेश्वर इंगोले, श्रीमती प्रिती गोरे, श्रीनिवास कल्याणकर, श्रीमती अल्लडवाड सुवर्णा, ए. एम. धर्माधिकारी, मारोती मामा यांच्यासह सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच बहुसंख्येने विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विद्यार्थिनी कु. अश्विनी हिने केले तर आभार प्रा. सीमा शिंदे यांनी मानले.

# नमस्कार चौकात आद्यक्रांतिवीर लहुजी साळवे यांच्या पुतळ्याची उभारणी करा; बहुजन संघर्ष सेनेची जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी



**नांदेड (प्रतिनिधी)** –नांदेड शहरातील अत्यंत महत्त्वाच्या आणि वर्दळीच्या मानल्या जाणाऱ्या नमस्कार चौक येथे आद्यक्रांतिवीर लहुजी साळवे यांचा पूर्णाकृती पुतळा बसवण्यात यावा, अशी आग्रही मागणी 'बहुजन संघर्ष सेना' या संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. या संदर्भात संघटनेच्या शिष्टमंडळाने जिल्हाधिकारी कार्यालयात जिल्हाधिकाऱ्यांना अधिकृत निवेदन सादर केले.

सादर करण्यात आलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, आद्यक्रांतिवीर लहुजी साळवे यांनी देश आणि समाजासाठी दिलेले योगदान अद्वितीय आणि ऐतिहासिक आहे. त्यांचा त्याग, विचार आणि पराक्रम भावी पिढीसाठी कायम प्रेरणादायी ठरत आला आहे. नांदेड शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या नमस्कार चौक येथे त्यांचा पुतळा उभारल्यास तो केवळ या महान महापुरुषाचा गौरव ठरणार नाही, तर नागरिकांच्या अस्मितेचा आणि आदराचा विषय बनेल.

या रास्त आणि जुन्या मागणीसाठी प्रशासनाकडे वारंवार पाठपुरावा करण्यात आला आहे. त्यामुळे प्रशासनाने या मागणीचे गांभीर्य लक्षात घेऊन तात्काळ प्रशासकीय मंजुरी द्यावी आणि पुढील आवश्यक ती कारवाई त्वरित सुरू करावी, अशी जोरदार मागणी बहुजन संघर्ष सेनेचे संस्थापक अध्यक्ष सुखदेव चिखलीकर यांच्या नेतृत्वाखाली करण्यात आली आहे.

यावेळी बहुजन संघर्ष सेनेचे प्रमुख पदाधिकारी राजेश चौदंते, नितीन देडे, यश बहादुरे, संतोष दुन्डे, कपिल धोंडगे, बाळासाहेब मल्हारे, अंकुश गालफाडे, शिवप्रसाद धोंगडे यांच्यासह इतर कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# लोह्यात शिवकल्याणनगर येथे घंटागाडी व डस्टबीनचे वाटप

### संगेवार दाम्पत्याच्या स्तुत्य उपक्रमाचे इतरांनी अनुकरण करावे - माजी आ. रोहिदास चव्हाण



**लोहा (प्रतिनिधी)** – येथील शिवकल्याणनगर प्रभाग क्रमांक ३ मध्ये नगरसेविका सौ. गिताजंली सोनू संगेवार व माजी उपनगराध्यक्ष सोनू संगेवार या दांपत्याने स्वखर्चातून प्रभागातील स्वच्छतेसाठी घंटा गाडी व डस्टबीन वाटपाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. त्यांच्या या उपक्रमांचे अनुकरण इतरांनी करावे व आपला प्रभाग व शहर स्वच्छ ठेवावे, असे आवाहन माजी आमदार रोहिदास चव्हाण यांनी शिवकल्याणनगर येथील ओंकारेश्वर मंदिरात घंटा गाडी व डस्टबीन वाटपाच्या लोकार्पण सोहळ्यात केले.

लोहा शहरातील शिवकल्याणनगर प्रभाग क्रमांक ३ मध्ये भारतीय स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून या प्रभागाच्या नगरसेविका सौ.गिताजंली सोनू संगेवार व माजी उपनगराध्यक्ष सोनू संगेवार या दांपत्याने प्रभागात स्वच्छता राहावी म्हणून स्वखर्चाने ओंकारेश्वर महादेव मंदिर येथे प्रभागातील केरकचरा उचलण्यासाठी एक घंटा गाडी व ३०० डस्टबीन वाटपाचा कार्यक्रम घेतला.

यावेळी कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून डॉ. दीपक भारती यांची उपस्थिती होती तर प्रमुख अतिथी म्हणून लोहा -कंधार मतदार संघाचे माजी आमदार रोहिदास चव्हाण, डॉ. डी. बी. कानवटे, स्वांतत्र्य सैनिकांच्या प्रतिनिधी श्रीमती कौशल्याबाई संगेवार, उद्योजक लक्ष्मण संगेवार, नगरसेवक प्र. विलास कहाळेकर, डॉ. चव्हाण, ज्येष्ठ नागरिक संघटनेचे भातलवंडे, डॉ. राठोड, डॉ. कोमावार, माजी नगरसेवक अनिल, माजी न. प. सभापती प्र. शरफोदीन शेख, हरी पाटील शिंदे, गजानन कळसकर, गोविंद पवार यांच्यासह प्रभाग क्रमांक ३ मधील नागरिक, बहुसंख्येने उपस्थित होते.

पुढे बोलताना रोहिदास चव्हाण म्हणाले की, या प्रभागाच्या नगरसेविका सौ. गिताजंली संगेवार व सोनू संगेवार यांनी घंटा गाडी व डस्टबीन वाटपाचा उपक्रम राबविला. स्वच्छता म्हणजे देवच आहे. घर, बंगला किती मोठे व सुंदर असले तरी स्वच्छता नसली तर त्याचा काही फायदा नाही. सोनू संगेवार यांनी कमीत कमी खर्चात जास्तीत जास्त कामे कसे करता येतील हे सुचविले. आम्ही नगर परिषदेतही संगेवार यांनी सुचविलेल्या अनेक संकल्पना पाळल्या. या डस्टबीनचा वापर चांगला करा. आपला वॉर्ड स्वच्छ, निरोगी राहो. यावेळी बोलताना डॉ. दीपक भारती म्हणाले की, नगरसेवक संगेवार दाम्पत्याने राबविलेला उपक्रम हा अतिशय चांगला आहे. त्यांच्या या उपक्रमांची कॉपीपेस्ट लोहा शहरासह सर्वत्र होईल. आपल्या सर्वांचा या उपक्रमाला हातभार लागेल असे डॉ. दीपक भारती म्हणाले. तसेच यावेळी बोलताना माजी वैद्यकीय अधीक्षक डॉ. डी. बी. कानवटे म्हणाले की, आजचा घंटागाडी व डस्टबीन वाटपाचा कार्यक्रम हा जनतेच्या आरोग्याशी संबंधित आहे. जनतेने सुध्दा या घंटागाडीला प्रतिसाद दिला आहे.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक सोनू संगेवार यांनी केले. यावेळी आभार नगरसेविका सौ. गितांजली संगेवार यांनी मानले तर कार्यक्रमांचे सूत्रसंचालन माजी नगरसेवक अनिल दाढेल यांनी केले.

CMYK

# चंदेरी

## कुब्रा सैतची विशेष मुलाखत

# सर्वात जास्त प्रगती कठीण परिस्थितीतच



'सेक्रेड गेम्स', 'द ट्रायल' आणि 'सन ऑफ सरदार २' सारख्या वेब सिरीज आणि चित्रपटांमध्ये दिसलेली अभिनेत्री कुब्रा सैत ही साहस करायला (ॲडव्हेंचर) खूप आवडते. कुब्राच्या मते, माणसाचा सर्वात मोठा शिक्षक हा कठीण परिस्थिती असतो आणि अशाच परिस्थितीमध्ये व्यक्तीचा खरा विकास होतो. स्क्रीनवर आपल्या बिनधास्त व्यक्तिमत्त्वासाठी ओळखल्या जाणाऱ्या कुब्राला खऱ्या आयुष्यातही धोक्यांशी खेळायला आवडते. त्यामुळेच ती कधी टांझानियातील किलीमांजारो पर्वतावर ट्रेकिंग करायला जाते, तर कधी जगातील चौथ्या क्रमांकाची मोठी नदी ब्रह्मपुत्राच्या लाटांवर रिवर राफ्टिंग करायला जाते. स्वतःला अशा अस्वस्थ किंवा कठीण परिस्थितीत झोकून देणे तिला आवडते. कारण यामुळे तिला स्वतःला जवळून ओळखण्याची संधी मिळते.

### ॲडव्हेंचर ट्रिपपेक्षा उत्तम शिक्षक दुसरा नाही

कुब्रा सांगते, की 'मला वाटते की जेव्हा तुम्ही 'कंफर्ट झोन'च्या बाहेर पडता, तेव्हाच तुमची खरी प्रगती होते. म्हणूनच स्वतःला अशा परिस्थितीमध्ये ठेवायला मला आवडते. जेव्हा तुम्ही अशा सहलींवर जाता जिथे झोपण्यासाठी गादी नसते, तुम्हाला तंबू (टेंट) आणि स्लीपिंग बॅगमध्ये झोपावे लागते, सकाळी ७:३० वाजता संपूर्ण बॅग पॅक करून बाहेर पडावे लागते आणि तुमची सर्व बोटे सुजलेली असतात. यातून जो संयम निर्माण होतो, तीच खरी शिकवण आहे. ती म्हणाली, की जेव्हा तुम्ही आयुष्याचा असा अनुभव घेता, तेव्हाच तुम्ही एक चांगले कलाकार बनू शकता. जर सर्व काही सहज आणि सोपे मिळाले, तर त्यात काय मजा? म्हणूनच मी दरवर्षी अशा साहसी ट्रिपवर जाते, कारण यामुळे मला स्वतःला शोधण्याची संधी मिळते.'

### कुब्रा सैतचे कुटुंब आणि करिअर

कुब्रा सैतचा जन्म कर्नाटकातील बेंगळुरू येथे एका मुस्लिम कुटुंबात झाला. तिचे वडील मोहम्मद हदीद आणि आई यास्मिन सेठ या व्यावसायिक आहेत. कुब्राने मॉडेलिंगपासून आपल्या करिअरची सुरुवात केली होती. याशिवाय तिने दुबईतील मायक्रोसॉफ्ट कंपनीमध्ये अकाउंट मॅनेजर म्हणूनही काम केले आहे. त्यानंतर कुब्रा भारतात परतली आणि २००९ मध्ये 'मिस वर्ल्ड वाइड ब्यूटी' स्पर्धेत भाग घेतला. २०११ मध्ये सलमान खानच्या 'रेडी' या चित्रपटातून तिने अभिनय क्षेत्रात पदार्पण केले. विशेष म्हणजे, २०१३ मध्ये कुब्रा सैतला आशियातील सर्वोत्तम 'पब्लिक स्पीकर' पुरस्कारानेही सन्मानित करण्यात आले आहे.



**'माणसाची सर्वात जास्त प्रगती तेव्हाच होते जेव्हा तो कठीण परिस्थितीत असतो. म्हणूनच मी दरवर्षी साहसी सहलीला जाते, कारण यामुळे मला स्वतःला अधिक चांगल्या प्रकारे जाणून घेता येते.'**

**- कुब्रा सैत**, अभिनेत्री


# अभिनेता झालो नसतो तर कदाचित जगलो नसतो...!



## अभिनेता सुविंदर विक्कीची विशेष मुलाखत : 'रिकामे बसण्याचा लाजिरवाणा अन् निराशेचा काळही अनुभवला'

**'धुरंधर २'मध्ये ब्रिगेडियर जहांगीरची छोटी भूमिका साकारणारे अभिनेते सुविंदर विक्की यांनी आपल्या सुमारे दोन दशकांच्या संघर्षाचा काळ, अभिनयावरील प्रेम आणि अलीकडच्या चित्रपटांमधील अनुभवांबाबत विशेष संवाद साधला. 'लाटांशी झुंज देऊनच नौका किनाऱ्यावर पोहोचते; प्रयत्न करणाऱ्यांचा कधीच पराभव होत नाही,' या कवी सोहनलाल द्विवेदी यांच्या ओळी केवळ कविता नाहीत, तर त्या सुविंदर विक्की यांच्या आयुष्याची कहाणी सांगतात. २००४ मध्ये अभिनय क्षेत्रात पाऊल ठेवलेल्या सुविंदर यांनी जवळपास २० वर्षे संघर्ष केला. काम नसताना घरी रिकामे बसणे, निराशा आणि अस्वस्थतेचा दीर्घ काळ त्यांनी अनुभवला. मात्र, मनातील अभिनेत्याला त्यांनी कधीही मरू दिले नाही. अखेर २०२३ मध्ये 'कोहरा' या वेबसीरिजने त्यांच्या कारकीर्दीला नवे वळण दिले आणि ते प्रेक्षकांच्या पसंतीस उतरले. सध्या 'धुरंधर २', 'सतलुज' आणि 'आवारापन २' यांसारख्या चर्चेत असलेल्या चित्रपटांमुळे सुविंदर विक्की पुन्हा एकदा प्रकाशझोतात आहेत.**

### मनात नकारात्मक विचार येत होते...



संघर्षाच्या त्या काळाबद्दल सुविंदर विक्की सांगतात, "तो काळ खूपच वाईट होता. अनेकदा रडू येईल अशी परिस्थिती निर्माण व्हायची. आई-वडिलांच्या डोळ्यांत एक प्रश्न असायचा 'मुलगा काही करणार आहे की असाच आमच्या छातीवर बसून राहणार?' पुरुष म्हणून कुटुंबाची जबाबदारी घेणे, मुलांचा सांभाळ करणे हे आपले कर्तव्य आहे, असे मला वाटायचे." ते पुढे म्हणतात, "आजच्या काळात महिलाही काम करतात. माझी पत्नीही काम करते. पण एक पुरुष म्हणून आपण घरी रिकामे बसून राहावे, ही भावना मला सतावत होती. माझी पत्नी काम करत आहे आणि मी घरी बसून एखाद्या प्रकल्पाची वाट पाहत आहे, याची मला खूप निराशा आणि लाज वाटायची. अनेकदा मनात विचित्र विचारही यायचे. तो काळ अत्यंत वेदनादायक होता." मात्र, या कठीण काळानंतर अखेर आपली वेळ आली, असे त्यांना वाटते. ते म्हणतात, "कुठेतरी माझी प्रामाणिकता देवापर्यंत पोहोचली असावी. जणू देवानेच म्हटले, 'चल मुला, आता तुझी वेळ आली आहे. तू खूप सहन केले आहेस.''

### 'धुरंधर 2'ची पटकथा न वाचताच स्वीकारली...

आदित्य धर यांच्या 'धुरंधर २' या चित्रपटात सुविंदर विक्की यांनी ब्रिगेडियर जहांगीरची छोटी भूमिका साकारली आहे. 'कोहरा'मध्ये प्रमुख भूमिका केल्यानंतर त्यांनी एवढी छोटी भूमिका का स्वीकारली, असे विचारल्यावर ते म्हणाले, "मी 'धुरंधर २'ची पटकथा न वाचताच काम केले. एके दिवशी मला मुकेश छाबरा यांचा फोन आला. ते म्हणाले, 'भाऊ, एक मोठे काम आहे; पण आणखी काही विचारू नका. उद्या किंवा परवा कधी चित्रित करू शकता? रात्रीचे चित्रीकरण आहे.' ते पुढे सांगतात, "मुकेश छाबरा यांच्याशी माझे चांगले संबंध आहेत. मी त्यांना विचारले, 'पाजी, एका रात्रीत तुम्ही माझ्याकडून एवढे मोठे काम कसे करून घेणार? १२-१५ दिवस असतील तर समजू शकतो.' ते म्हणाले, 'माझ्यावर विश्वास आहे ना? मग माझ्या विश्वासावर हे काम करा.' त्यानंतर माझ्याकडे दुसरा पर्यायच नव्हता. मला पटकथा व्हॅनिटी व्हॅनमध्ये पोहोचल्यानंतर मिळाली. त्या वेळी माझ्या भूमिकेचा एवढा प्रभाव पडेल, याची मला कल्पनाही नव्हती."

### दिवसा 'कोहरा', रात्री 'सतलुज'चे चित्रीकरण

सुविंदर विक्की यांच्या 'सतलुज' या चित्रपटाबाबतही मोठी चर्चा झाली. ओटीटीवर प्रदर्शित झाल्यानंतर अवघ्या दोन दिवसांत तो हटवण्यात आल्याने वाद निर्माण झाला. मात्र, या चित्रपटातील एसएसपी सुरजीत सिंह सुग्गा या भूमिकेसाठी सुविंदर यांचे मोठे कौतुक झाले. चित्रपट हटवल्याबद्दल निराशा व्यक्त करताना ते म्हणतात, "हे खूप निराशाजनक होते. दिग्दर्शक हनी त्रेहान आणि निर्मात्यांनी हा चित्रपट प्रेक्षकांपर्यंत पोहोचवण्यासाठी खूप संघर्ष केला होता. जनतेसाठी तयार केलेली एखादी कलाकृती त्यांच्यापर्यंत पोहोचण्याचा अधिकार प्रत्येकाला असायला हवा. तुम्ही एखादे स्वादिष्ट जेवण बनवले, ते उत्तम पद्धतीने वाढले; पण ते खाणारेच नसतील तर वाईट वाटणारच." 'सतलुज'च्या चित्रीकरणातील एक रंजक किस्साही त्यांनी सांगितला. "मी 'कोहरा'चे चित्रीकरण सुरू असतानाच 'सतलुज'चेही चित्रीकरण केले. त्या काळात माझ्या तारखाही एकमेकांशी जुळत नव्हत्या." ते म्हणाले, 'कोहरा'चे दिग्दर्शक सुदीप शर्मा यांच्याशी हनी त्रेहान यांनी चर्चा केली होती. सुदीप मला दुपारी एका ठराविक वेळी लुधियानाहून मोकळे करतील, त्यानंतर मी अडीच तासांत तरनतारणला पोहोचेन, ते माझे दृश्य उशिरा घेतील आणि लवकर चित्रीकरण संपवतील, असे ठरले. असे सलग सहा दिवस चालले. त्या दिवसांची आठवण झाली तरी आजही अंगावर काटा येतो. मी ही गोष्ट पहिल्यांदाच कोणाला सांगत आहे.'

### 'अभिनेता झालो नाही तर मरेन' अशी अवस्था



अभिनय सोडून दुसरे काम करण्याचा विचार कधी केला का, या प्रश्नावर सुविंदर म्हणतात, "हा एक प्रकारचा जीवनमरणाचा संघर्ष होता. अन्यथा मी अनेक नोकऱ्या करू शकलो असतो. मी विमा क्षेत्रात नोकरी करत होतो. त्यात पुढे जाऊ शकलो असतो किंवा एखादा व्यवसायही सुरू करू शकलो असतो. पण मनाच्या आतून एकच भावना होती, 'अभिनेता होणार नसेन तर मी मरेन.' कदाचित माझ्या मनातील ही प्रामाणिक इच्छा देवापर्यंत पोहोचली असावी आणि म्हणूनच मला 'कोहरा' आणि त्यानंतर हे चित्रपट मिळाले."

### आझमी, हाश्मींकडून बरेच शिकण्यासारखे...

आपल्या अलीकडील 'आवारापन २' या चित्रपटातील अनुभवाबद्दल सुविंदर सांगतात, 'आवारापन' हा एक कल्ट चित्रपट आहे. मला 'आवारापन २'मध्ये काम करण्याची संधी मिळाली, याचा अर्थ कदाचित मी माझ्या आयुष्यात कला आणि अभिनयाच्या क्षेत्रात काहीतरी मिळवले आहे. चित्रपटातील माझी भूमिका उत्तम आहेच; पण शबाना आझमी आणि इमरान हाश्मी यांच्यासोबत काम करणे हा माझ्यासाठी जबरदस्त अनुभव होता.' ते पुढे म्हणतात, "झाडावर जितकी जास्त फळे असतात, तितके ते अधिक वाकते, असे म्हणतात. हीच गोष्ट या कलाकारांमध्ये पाहायला मिळते. त्यांच्यातील नम्रता आणि साधेपणा खरोखरच शिकण्यासारखा आहे."

# पश्चात्ताप नाही; संधी मिळाल्या, पण अडचणीही खूप आल्या...

## अभिनेत्री अक्षरा हासनची विशेष मुलाखत

**अभिनेत्री अक्षरा हासन हिने अलीकडेच दिलेल्या विशेष मुलाखतीत कारकीर्द, कुटुंबासोबतचे नाते, अभिनयासह विविध कलाप्रकारांविषयीची आवड आणि आयुष्यात आलेल्या अडचणींबाबत मनमोकळेपणाने संवाद साधला. देशातील प्रसिद्ध चित्रपट कुटुंबात जन्मलेल्या अक्षरा हासन यांनी वडील कमल हासन, आई सारिका आणि मोठी बहीण श्रुती हासन यांच्या पावलावर पाऊल ठेवत अभिनय क्षेत्राची निवड केली. मात्र, आपल्याला केवळ अभिनयाचीच नव्हे, तर नृत्य, लेखन आणि दिग्दर्शनासह विविध कलाप्रकारांची आवड असल्याचे ती सांगते.**

अलीकडेच 'सिम्यूलाक्रा' या चित्रपटामुळे चर्चेत आलेल्या अक्षराला विचारण्यात आले की, घरातील आई- वडील आणि बहीण अभिनय क्षेत्रात असल्यामुळे तिचाही कल चित्रपटांकडे झाला का? त्यावर ती म्हणाली, की 'कलेच्या विविध प्रकारांकडे माझा ओढा निर्माण होण्याचे श्रेय निश्चितच माझ्या आई-वडिलांना जाते. त्यांनी मला वेगवेगळ्या कलाप्रकारांचा अनुभव घेण्याचे आणि ते समजून घेण्याचे स्वातंत्र्य दिले. मात्र, अभिनय हीच एकमेव गोष्ट आहे, जिच्यावर माझे प्रेम आहे, असे नाही.'





### अभिनयासोबत अनेक कलाप्रकारांची आवड

अक्षरा म्हणाली, की मला अनेक कलाप्रकार आवडतात. सर्वांत आधी नृत्याची आवड निर्माण झाली. त्यानंतर लेखनाकडे वळले आणि मग अभिनयाची आवड निर्माण झाली. आता दिग्दर्शनाकडेही माझा कल आहे. त्यामुळे माझ्यासाठी हे केवळ अभिनयापुरते मर्यादित नाही. मला कलेच्या विविध रूपांशी जोडलेले राहायला आवडते. आई-वडील अभिनेते होते म्हणून मीही अभिनेत्री झाले, असे नाही. सध्या माझा अधिक भर दिग्दर्शनावर आहे. भविष्यात मी नक्कीच एखाद्या चित्रपटाचे दिग्दर्शन करणार आहे, असे ती म्हणाली.

### संधी मिळाल्या, पण अडचणीही भरपूर आल्या...

अक्षरा हासन हिने २०१५ मध्ये अमिताभ बच्चन आणि धनुष यांच्यासोबत 'शमिताभ' या चित्रपटातून अभिनय क्षेत्रात दमदार पदार्पण केले. मात्र, त्यानंतर त्यांच्या कारकीर्दीला अपेक्षित वेग मिळाला नाही. याबाबत ती म्हणाली, की मला संधी मिळाल्या, पण त्यासोबत अडचणीही खूप आल्या. मला ज्या- ज्या चित्रपटांमध्ये काम करण्याची संधी मिळाली, त्यापैकी प्रत्येकामध्ये काही ना काही गोष्ट अपेक्षेप्रमाणे घडली नाही. त्यामुळे त्या चित्रपटांचा अपेक्षित परिणामही झाला नाही. माझ्यासोबत बहुतांश वेळा असेच घडले. म्हणूनच मी स्वतःला केवळ अभिनयापुरते मर्यादित ठेवले नाही. लेखन आणि दिग्दर्शनासारख्या इतर कलाप्रकारांकडेही वळले.

### कोणत्याही निर्णयाचा पश्चात्ताप नाही...

अक्षराला तिच्या कारकीर्दीच्या सुरुवातीला प्रसिद्ध दिग्दर्शक मणिरत्नम यांनी चित्रपटाची ऑफर दिली होती. मात्र, तिने ती स्वीकारली नाही. या निर्णयाचा कधी पश्चात्ताप होतो का, असे विचारले असता ती म्हणाली, की मला कोणत्याही गोष्टीचा पश्चात्ताप नाही, कारण प्रत्येक गोष्टीची एक योग्य वेळ असते. मणिरत्नम सरांनी मला चित्रपटाची ऑफर दिली, त्या वेळी माझा संपूर्ण भर नृत्यावर होता. मी माझ्या मनातील गोष्ट त्यांना सांगितली. त्यांनी माझ्या निर्णयाचा आदर केला आणि मला कधीही अपराधी वाटेल असे केले नाही. त्यामुळे मला त्या निर्णयाबद्दल अजिबात खंत नाही. कदाचित तो चित्रपट करण्यासाठी माझ्यासाठी ती योग्य वेळ नव्हती.

### बहिणी श्रुतीसोबत 'यिन-यांग'सारखे नाते

अक्षरा यांनी आई-वडील कमल हासन आणि सारिका तसेच बहीण श्रुती हासन यांच्यासोबतच्या नात्याबद्दलही सांगितले. ती म्हणाली, की वडिलांनी मला नेहमी शिकवले की नम्रता, प्रामाणिकपणा आणि कठोर परिश्रम हे यशाचे तीन मूलमंत्र आहेत. याशिवाय, चित्रपटसृष्टीत कोणत्याही एका गोष्टीचा हट्ट धरून बसू नये. प्रत्येक आव्हानासाठी तयार राहिले पाहिजे आणि आपले सर्वोत्तम देण्याचा प्रयत्न केला पाहिजे. हे गुण नेहमीच उपयोगी पडतात. 'शमिताभ'मध्ये काम करताना अमिताभ बच्चन यांच्यातही मला हेच गुण पाहायला मिळाले, असे ती म्हणाली. श्रुतीसोबतच्या नात्याबद्दल ती म्हणाली, की आम्ही बहिणी आहोत आणि एकमेकींबाबत खूपच काळजी घेणाऱ्या आहोत. आम्ही एकमेकींच्या मैत्रिणीही आहोत. आमचे नाते 'यिन-यांग'सारखे आहे. म्हणजेच आमचे स्वभाव एकमेकांपेक्षा अगदी वेगळे आहेत; मात्र आम्ही एकमेकींशिवाय राहू शकत नाही. हाच फरक आमचे नाते आणखी मजबूत करतो.

### आयुष्यातील कोणतीही आठवण पुसायची नाही...



अक्षराच्या 'सिम्यूलाक्रा' या चित्रपटाची कथा आठवणी जपणे आणि त्या पुसून टाकणे या अनोख्या संकल्पनेभोवती फिरते. त्यामुळे खऱ्या आयुष्यातील कोणत्या आठवणी ती पुसून टाकशील आणि कोणत्या जपून ठेवू इच्छिते, असा प्रश्न तिला केला असता ती म्हणाली, की 'मी माझ्या सर्व आठवणी आणि अनुभव माझ्यासोबत ठेवेन. कारण याच आठवणी आणि अनुभवांनी आजची व्यक्ती म्हणून मला घडवले आहे. त्यामुळे मला माझ्या आयुष्यातील कोणतीही आठवण पुसून टाकायची नाही. मला सर्व काही जपून ठेवायचे आहे. काहीही मिटवायचे नाही, कारण मला माझ्या आयुष्यातील कोणत्याही गोष्टीचा पश्चात्ताप नाही.'

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.



# गोदातीर समाचार



**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308




# नांदेडमध्ये सर्व रोगमुक्ती योगिक समुपदेशन केंद्राचा शुभारंभ





**नांदेड (प्रतिनिधी)** –युवकांमध्ये वाढते ताणतणाव, नकारात्मक विचार आणि चुकीच्या निर्णयांच्या समस्यांवर योग्य वेळी समुपदेशन होणे अत्यंत आवश्यक असून, योगिक समुपदेशनामुळे युवकांना मानसिक, शारीरिक आणि नैतिकदृष्ट्या सक्षम करण्यास मदत होईल, असे प्रतिपादन स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी केले.

नांदेड योग सेवा समितीच्या पुढाकारातून सुरू करण्यात आलेल्या 'सर्व रोगमुक्तीसाठी योगिक समुपदेशन केंद्रा'च्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. योगरत्न सीताराम सोनटक्के गुरुजी यांच्या प्रमुख उपस्थितीत दीपप्रज्वलन व गायत्री मंत्रोच्चाराने कार्यक्रमाचा प्रारंभ झाला.

कार्यक्रमास स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, उद्योजक व सामाजिक कार्यकर्ते हर्षदभाई शहा, संपादक केशव घोणसे पाटील, पत्रकार प्रल्हाद कांबळे, श्रीनिवास भोसले, गिरीश कहाळेकर, संतोष कुलकर्णी, बसवराज बिरादार, माधव पावडे, नायब तहसीलदार स्वप्नील दुगलवार तसेच नांदेड योग सेवा समितीचे पदाधिकारी, योग शिक्षक, पत्रकार, सामाजिक कार्यकर्ते आणि योगप्रेमी नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी मान्यवरांचे पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सत्कार करण्यात आला. डॉ. चासकर यांनी सांगितले की, १५ ते २५ वयोगटातील युवकांना विशेषतः योग्य समुपदेशनाची गरज आहे. विद्यापीठात विद्यार्थ्यांसाठी स्वतंत्र समुपदेशन केंद्र सुरू करण्याबाबत प्रयत्न करण्यात येतील. काही सेवा प्रत्यक्ष तर काही ऑनलाइन पद्धतीने उपलब्ध करून देण्याचाही विचार आहे. गंभीर आजारांमध्ये केवळ योगावर अवलंबून न राहता वैद्यकीय उपचारांसोबत योगाचा समतोल वापर करावा, असेही त्यांनी स्पष्ट केले.

योगरत्न सीताराम सोनटक्के यांनी नांदेडमध्ये १८ ते २० मोफत योगवर्ग सुरू असून, 'हर घर योग' या संकल्पनेतून प्रत्येक वाडी, तांडा, गल्ली आणि वस्तीत योग पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला. योगामुळे आरोग्यदायी व तणावमुक्त जीवनशैली विकसित होऊ शकते, असे त्यांनी सांगितले. हर्षदभाई शहा यांनी आरोग्य हीच खरी संपत्ती असल्याचे सांगून युवकांनी नियमित योग व व्यायाम करण्याचे आवाहन केले. संपादक केशव घोणसे पाटील यांनी योगाच्या मानसिक, आरोग्यविषयक महत्त्वावर प्रकाश टाकला. शारीरिक आणि मानसिक तंदुरुस्त राहण्यासाठी प्रत्येकाने योग करणे आवश्यक असल्याचे पाटील म्हणाले.

केंद्रासाठी कोणतेही शुल्क न घेता जागा उपलब्ध करून देणारे बसवराज बिरादार व माधव पावडे यांच्या सामाजिक दातृत्वाचे विशेष कौतुक करण्यात आले. नांदेडमधील प्रत्येक कॉलनी आणि महाविद्यालयापर्यंत योग पोहोचविण्याचा संकल्प व्यक्त करून कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीत व 'करो योग, घर-घर जाएंगे, सबको योग सिखाएंगे' या घोषवाक्याने झाली.

## तिकीट तपासणी मोहिमेत ४.२५ लाखांचा महसूल वसूल

**नांदेड (प्रतिनिधी)**– प्रवाशांनी वैध तिकिटासह प्रवास करावा, रेल्वेच्या नियमांचे पालन करावे आणि सर्व प्रवाशांना सुरक्षित व सुव्यवस्थित प्रवासाचा अनुभव मिळावा, या उद्देशाने दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागात २१ ऑगस्ट रोजी व्यापक तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली.

सर्व तिकीट तपासणी पथकांच्या सक्रिय सहभागाने ही मोहीम सकाळी ४:३० ते रात्री आठ वाजेपर्यंत राबविण्यात आली. मोहिमेचे प्रभावी निरीक्षण सहायक वाणिज्य व्यवस्थापक शैलेश कुमार सिंह यांनी केले.

या विशेष मोहिमेत ३२ तिकीट तपासणी कर्मचारी आणि ३ RPF जवान सहभागी झाले. विभागातील विविध मार्गांवरील २६ गाड्यांची तपासणी करण्यात आली. तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी प्रवाशांशी संवाद साधत वैध तिकीट घेऊन प्रवास करण्याचे तसेच रेल्वेच्या नियमांचे पालन करण्याचे आवाहन केले.

आपले सरकार सेवा केंद्रांची जिल्हाधिकाऱ्यांकडून प्रत्यक्ष पाहणी

## नियमबाह्य केंद्रावर तत्काळ कारवाई –राहुल कर्डिले

**नांदेड (प्रतिनिधी)** – जिल्ह्यातील आपले सरकार सेवा केंद्रांनी शासन निर्णयानुसार निर्धारित गुणवत्ता, मानांकन व सन्मान कार्यपद्धतीचे मुदतीत पालन करणे अनिवार्य आहे. त्याअनुषंगाने जिल्हाधिकारी नांदेड राहुल कर्डिले यांनी शनिवार, दि. २२ ऑगस्ट रोजी प्रत्यक्ष दोन आपले सरकार सेवा केंद्रांना भेट देऊन केंद्रांची सखोल पाहणी केली. पाहणीदरम्यान शासनाच्या निकषांचे पालन न करणाऱ्या केंद्रांवर कार्यवाही करण्यात आली, त्यामुळे नियमांचे उल्लंघन करणाऱ्या केंद्रचालकांमध्ये स्पष्ट संदेश गेला आहे.

या पाहणीमध्ये शासन निर्णयानुसार निर्धारित केलेल्या जागेत सुरू आहे काय, केंद्राचे आतील व बाहेरील बॅनर, उपलब्ध सेवा व दरसूची, स्वच्छता, विद्युत व्यवस्था, संगणक संच, प्रिंटर, UPS, वेब कॅमेरा, नागरिकांना सभ्यतेची वागणूक, केंद्राच्या खोलीची आवश्यक आकारमानाची पूर्तता, पिण्याच्या पाण्याची व्यवस्था, अर्जदारांसाठी खुर्च्यांची व्यवस्था तसेच संगणक प्रणालीमध्ये अर्जदारांची कागदपत्रे व छायाचित्रांची माहिती सुरक्षित पद्धतीने जतन करणे बाबत पडताळणी करण्यात आली. तसेच जिल्हाधिकारी यांनी आपले सरकार सेवा केंद्रावर उपस्थित अर्जदारांशी सेवा बाबत प्रत्यक्ष संवाद साधून शासनाने निर्धारित केलेल्या शुल्कापेक्षा पावतीशिवाय अथवा अतिरिक्त रक्कम आकारली जाते काय, याची चौकशी केली. अर्जदारांना प्रमाणपत्रानुसार



तत्काळ पावती दिली जाते काय, तसेच ऑनलाईन पावतीमध्ये नमूद असलेल्या शुल्कानुसारच रक्कम स्वीकारली जाते काय, याचीही प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आली. अर्जदारांनी सर्व सेवाकरिता केंद्रचालकाकडून रितसर पावती घ्यावी, असे आवाहन केले.

आपले सरकार सेवा केंद्रांच्या माध्यमातून नागरिकांना शासनाच्या विविध सेवा पारदर्शक, सुलभ व नियमानुसार उपलब्ध करून देणे हा शासनाचा प्रमुख उद्देश आहे. त्यामुळे सर्व केंद्रचालकांनी शासन निर्णयातील सर्व निकषांची काटेकोरपणे पूर्तता करून केंद्रे नियमितपणे सुरू ठेवावीत. नियमांचे उल्लंघन, अनधिकृत शुल्क आकारणी, अपुऱ्या सुविधा किंवा केंद्र बंद ठेवणे आढळल्यास संबंधित केंद्रावर नियमानुसार कठोर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट संदेश जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी या पाहणीमधून दिला आहे.

## आदिवासी महिलेचा विनयभंग

### गोकुंदा शासकीय विश्रामगृहातील घटना

**किनवट (प्रतिनिधी)** –गोकुंदा येथील शासकीय विश्रामगृहात काम करणाऱ्या ४३ वर्षीय आदिवासी महिलेचा विनयभंग करून तिच्याकडे शरीरसुखाची मागणी केल्याप्रकरणी बालाजी केंद्रे (रा. कोपरा, ता. किनवट) याच्याविरुद्ध किनवट पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार २० ऑगस्ट रोजी दुपारी साडेतीनच्या सुमारास संबंधित महिला विश्रामगृहातील किचन रूममध्ये काम करीत असताना आरोपी तेथे आला. त्याने महिलेकडे पाहून अश्लील स्वरूपाची वक्तव्ये करीत तिच्याकडे शरीरसुखाची मागणी केल्याचे तक्रारीत नमूद आहे. त्यानंतर २१ ऑगस्ट रोजी सकाळी साडेदहाच्या सुमारास महिला पुन्हा किचन रूममध्ये काम करीत असताना आरोपीने तिचा हात पकडून बोलण्याचा बहाणा करीत पुन्हा शरीरसुखाची मागणी केल्याचा आरोप आहे. या प्रकारामुळे महिलेने पोलिसांत तक्रार दाखल केली.

महिलेच्या तक्रारीवरून आरोपीविरुद्ध भारतीय न्याय संहितेतील कलम ७४, ७५(२) तसेच अनुसूचित जाती-जमाती अत्याचार प्रतिबंधक अधिनियम १९८९ मधील कलम ३(१)(w)(i), ३(१)(w)(ii) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. २२ ऑगस्ट रोजी दुपारी १.५८ वाजता गुन्ह्याची नोंद करण्यात आली. या प्रकरणाचा पुढील तपास किनवट उपविभागाचे उपविभागीय पोलीस अधिकारी चंद्रशेखर कदम करीत असून, त्यांनी पोलीस उपनिरीक्षक लेनगुळे यांच्यासह घटनास्थळी भेट देऊन तपास सुरू केला आहे.

इकडचं तिकडचं

## लेकरं जन्माला घालावी की नाही?

परिस्थिती नसतानाही ड्रायव्हर बापाने नीटची तयारी करणाऱ्या एकुलत्या एक मुलाला त्याच्या मागणीवरून आयफोन घेऊन दिला. त्या आयफोनच्या थकित हप्त्यावरुन जन्मदात्याशी वाद झाल्याने एकोणीस वर्षांच्या एका मुलाने आई-वडील, पोलीस व शेकडो लोकांच्या विनवण्या धुडकावून लावत खोल दरीत स्वतःला झोकून दिले. तू मला सोडून जाऊ नको, हवं तर मी तुझ्या बापाला सोडते, नवऱ्यापासून वेगळं राहते असे म्हणत मंगळसूत्र तोडून भिरकावणाऱ्या आईच्या शब्दानेही कार्ट्याला पाझर फुटला नाही. याच घटनेत काळजाच्या तुकड्याला वाचवण्याच्या नादात बिचारा बापही दरीत कोसळून गतप्राण झाला. नंतर काही क्षणातच आईनेही उडी घेऊन जीव दिला. संवेदना बोथट झालेल्या पोराच्या मोबाईल हट्टापायी अख्खं कुटुंब संपलं. या घटनेमागे केवळ मोबाईलचा थकित हप्ता की आणखी काही, हे सत्य बाहेर येईल न येईल, परंतु तोवर तरी या घटनेमुळे 'मोबाईल' या विषयासह संयम सुटलेल्या आजच्या पिढीचे संस्कार, पॅरेंटिंग, बेशिस्त, बेफिकीर, बेदरकार वृत्ती आदी विषयांवर समाजमाध्यमे व चौकाचौकांत चर्चा सुरू झाली. आजच्या टिनएजर्सची मानसिकता कुठं चाललीये, यावर तर्कवितर्क लावले जात आहेत.

'आईवडिलांनी मुलांसमोर मोबाईल वापरुच नये, असं करु नये, तसं करु नये' पासून तर 'मुलांचे सर्व हट्ट पुरवणे म्हणजे मुलांवर प्रेम करणे ही पॅरेंटिंगची व्याख्या चुकीची आहे, मुलांशी सुसंवाद कमी पडतोय' पर्यंत लोकांची या चर्चेतील मतं मी ऐकली.

सकाळी-सकाळी नांदेड शहरातील एका योगा सेंटरबाहेर योगसाधकांचा संघ यावरच बोलत होता. एकजण म्हणाला, जाणत्या मुलांसमोर घराचे अर्थकारण आपण उघडं करायला हवं, आपल्या बापाची औकात किती आणि आपल्यासाठी औकातीबाहेर जाऊन बाप करतोय किती हे पोट्ट्यांना कळायलाच हवं. दुसरा हो-ला-हो जोडत म्हणाला, वारंवार बघितल्यामुळे सोशल मीडियावरील कॅमेऱ्यासमोरचं आभासी व काल्पनिक विश्व पोरांना सत्य व वास्तव वाटायला लागलं. त्यांना जीवनाचा खरा अर्थच कळाला नाही. तिसऱ्यानेही तीच री ओढत सगळाच दोष 'रॉंग पॅरेंटिंग'चा असल्याचे मत मांडले. मोबाईलऐवजी पालकांनी मुलांना बुध्द, जिजाऊ, शिवराय, शंभूराजे, ताराराणी, सावित्रीमाई, डॉ. बाबासाहेब इत्यादी महामानवांच्या संघर्षगाथा वाचण्यासाठी प्रेरित करावे, असे केले तर एकाही घरात आत्महत्या होणार नाही, असे चौथ्याने ठणकावून सांगितले. त्याच घोळक्यात योगसाधनेला नव्यानेच जोडला गेलेला ग्रामीण भागातील एक पंचवीशीचा तरुण साधक सगळ्यात शेवटी व्यक्त झाला, 'च्यामारी, डोस्कंच सुन्न पडलंय राव! मला वाटायलंय लगीनच करु न्हाई. पर मायच्या माघाऱ्या मला भाकर-तुकडा करुन कोण घालील? या वांद्यापाई समजा करावं बी लागलं लगीन, तर मायच्यान लेकरं जन्माला घालायची का न्हाई? त्येचा शंभरदा इच्चार जरुर करीन ब्वॉ!'

व्यक्ती तितक्या प्रवृत्ती, आपापल्या परीने योगसंघातील लोकं प्रतिक्रिया देत होती, नेमकं वर्मावर कुणीही बोट ठेवत नव्हतं. दुर्लभ मानवी जीवन त्यागून मृत्यूला कवटाळण्याइतपत उद्विग्नता कोवळ्या मनात येण्याच्या घटना वाढताहेत. ही येणाऱ्या मोठ्या अराजकाची नांदी समजावी का?

योगसंघ साधकांची चर्चा ऐकून मला जगतगुरु तुकाराम महाराजांचा अभंग आठवला, तो मनात रिपिट करत-करत मी तिथून गोदातीरच्या ऑफिसकडे जाण्यासाठी निघालो; मातापित्यांसवे करिती जो वाद, त्यांचा तो संवाद दुःखदची;

तुका म्हणे ऐशा पुत्राची ती माता, प्रसवली वृथा दुःख पावे।।

**शिवाजीराजे पाटील बाभळीकर**

## गोदावरी पात्रातील वाळू माफियांवर पोलिसांचा वरवंटा; बोटी-तराफे जागीच नष्ट, जुगार अड्ड्यावरही कारवाई

**नांदेड (प्रतिनिधी)**– नांदेड जिल्ह्यात अवैध धंद्यांविरोधात पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या आदेशाने सुरू असलेल्या विशेष मोहिमेअंतर्गत नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीत अवैध धंद्यांविरुद्ध धडक मोहीम राबवून तीन स्वतंत्र कारवायांमध्ये एकूण ४७ लाख ८४ हजार ३०० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

**पिंपळगाव निमजी परिसरातील गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उत्खननावर कारवाई**

दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार अवैध धंद्यांविरुद्ध पेट्रोलिंग करीत असताना पिंपळगाव निमजी परिसरातील गोदावरी नदीपात्रात काहीजण लोखंडी बोटी व तराफ्यांच्या सहाय्याने अवैधरीत्या रेतीचा उपसा करीत असल्याची गुप्त माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीची खातरजमा करून पोलीस पथकाने पंचांना सोबत घेत घटनास्थळी कारवाई केली. पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले असता वाळूचा अवैध उपसा करणारे दोनजण पोलिसांची चाहूल लागताच नदीपात्रातून पलीकडील किनाऱ्याच्या दिशेने पळून गेले. ते दोन्ही आरोपी सध्या अज्ञात आहेत.

घटनास्थळाची पाहणी केली असता नदीपात्रातून अवैधरीत्या उपसा करून ठेवलेली अंदाजे १० ब्रास वाळू (अंदाजे किंमत ५० हजार रुपये), तसेच २ मोठ्या लोखंडी बोटी (जागेवर नष्ट-अंदाजे किंमत ३० लाख रुपये), १२ तराफे (जागेवर नष्ट - अंदाजे किंमत ६ लाख रुपये) व २ जुनी वापरातील इंजिने (जागेवर नष्ट- अंदाजे किंमत ६ लाख रुपये) आढळून आली. सदर मुद्देमालाची एकूण अंदाजे किंमत ४२ लाख ५० हजार रुपये आहे. पंचनामा करून सदर मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी दोन अज्ञात आरोपींविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे येथे गुन्हा क्र. १०३२/२०२६, कलम ३०३(२), ३(५)



भारतीय न्याय संहिता, सहकलम ४८(७), ४८(८) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, तसेच कलम ९ व १५ पर्यावरण (संरक्षण) अधिनियम आणि कलम ३ व ७ सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

**भनगी गावाच्या शिवारातील गोदावरी नदीपात्रात अवैध वाळू उत्खननावर कारवाई**

दि. २२ ऑगस्ट २०२६ रोजी सायंकाळी नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे अधिकारी व अंमलदार नियमित गुन्हे शोध व पेट्रोलिंगचे काम करीत असताना भनगी गावाच्या शिवारातील गोदावरी नदीपात्रात तराफ्याच्या मदतीने अवैध रेती उत्खनन होत असल्याची माहिती मिळाली.

मिळालेल्या माहितीची खातरजमा करून पोलीस पथक घटनास्थळी रवाना झाले. सायंकाळी सुमारे १९.१० वाजता पोलीस पथक घटनास्थळी पोहोचले असता नदीपात्राच्या काठावर रेतीचा अवैध उपसा करणारे दोन जण पोलिसांना पाहून अंधाराचा फायदा घेत पळून गेले. घटनास्थळाची पाहणी केली असता शासनाची कोणतीही परवानगी न घेता उपसा करून ठेवलेली अंदाजे १० ब्रास वाळू (अंदाजे किंमत ५० हजार रुपये) व वाळू उपशासाठी वापरण्यात येणारे ३ तराफे (प्रत्येकी अंदाजे ५० हजार रुपये) आढळून आले. सदर मुद्देमालाची एकूण अंदाजे किंमत २ लाख रुपये आहे. वाळू उपसण्यासाठी वापरण्यात येणारे तराफे कटरने तोडून, जाळून व पाण्यात बुडवून नष्ट करण्यात आले आहे.

## डीआयजी उमाप यांच्या पथकाची लातुरात मटका व जुगार अड्ड्यांवर कारवाई

### २६ आरोपींविरुद्ध गुन्हा; १९ लाखांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)**–परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना पायबंद घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी आपल्याकडील अधिकारी व अंमलदारांचे एक पोलीस पथक लातूर जिल्ह्यात रवाना केले होते.

या पथकाने दि. २२ ऑगस्ट रोजी मुरुड पोलीस ठाण्याच्या हद्दीत, मुरुड बायपासवरील दत्त मंदिराचे बाजूस असलेल्या रामेश्वर सवाशे यांचे शेतातील पत्र्याचे शेडमध्ये जुगार खेळणाऱ्यांविरुद्ध कारवाई करत ३१ हजार ७४० रुपयांची रोकड, १९ मोबाईल, २ चारचाकी व १० मोटारसायकली असा एकूण १७ लाख ८१ हजार ७४० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला असून, नमूद प्रकरणात एकूण १९ इसमांना ताब्यात घेऊन त्यांचेविरुध्द मुरुड पोलीस ठाणे येथे गुरनं २९५/२०२६ कलम ४,५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा नोंदवून, त्याचा तपास मुरुड पोलीस ठाण्यातील पोहेकॉ बाबासाहेब खोपे यांच्याकडे सोपविण्यात आला आहे.

त्याचप्रमाणे पथकाने शिवाजीनगर पोलीस ठाण्याच्या हद्दीत दयानंद कॉलेज गेटजवळील रोडलगत पत्र्याच्या शेडमध्ये मटका बुकीवर कारवाई करत २० हजार ३९० रुपयांची रोकड, ६० हजार रुपयांचे ७ मोबाईल व ४५ हजार ९०० रुपयांचे संगणक साहित्य जप्त केले आहे.

या प्रकरणात एकूण ७ आरोपीतांना ताब्यात



घेऊन त्यांचेविरुध्द शिवाजीनगर पोलीस ठाणे येथे गुरनं ४१९/२०२६ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार कायदा सह कलम ४ (अ) (ग) महाराष्ट्र राज्य लॉटरी कायद्यान्वये गुन्हा नोंदवून त्याचा तपास शिवाजीनगर पोलीस ठाण्यातील पोहेकॉ. अनंत बुधोडकर यांच्याकडे सोपविण्यात आला आहे. उपरोक्त दोन्ही कारवायांत एकूण २६ आरोपींकडून ५२ हजार १३० रुपयांची रोकड, २६ मोबाईल, २ चारचाकी, १० मोटारसायकली व संगणक साहित्य असा एकूण १९ लाख ८ हजार ३० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.


**पान १ वरून...**


**साखरेची साठेबाजी रोखण्यासाठी....**

पेक्षा जास्त आहे. असे खरेदीदार त्यांच्या १५ दिवसांच्या गरजेपेक्षा जास्त साखरेचा साठा करू शकणार नाहीत.

यापूर्वी, सरकारने व्यवसायांसाठी ३० दिवसांच्या साखर साठ्याची मर्यादा निश्चित केली होती. मात्र, किमतींमध्ये सतत होणाऱ्या वाढीमुळे, ही मर्यादा आणखी कमी करून १५ दिवसांवर आणली आहे. याचे कारण असे की, सणासुदीच्या काळात साखरेची मागणी मोठ्या प्रमाणात वाढते आणि बिस्किट, मिठाई व कन्फेक्शनरी उत्पादक अनेकदा आगाऊ साठा करून ठेवतात. सरकार खरेदीदारांच्या साखर खरेदी आणि वापराशी संबंधित माहितीची पडताळणी करेल.

**नांदेडमध्ये आणखी एका शिक्षकाची...**

नांदेडजवळील पुणेगाव येथे गोदावरी नदीत कार टाकून एका शिक्षकाने आपल्या दोन मुलांसह १७ जुलै रोजी आत्महत्या केली होती. या प्रकरणाचा तपास अद्याप शून्य असताना नांदेडमध्ये आणखी एका शिक्षकाने विषारी द्रव्य प्राशन करून आत्महत्या केली आहे. या दोन्ही शिक्षकांनी नांदेड जिल्हा परिषदेकडे पत्रव्यवहार केला होता; मात्र त्यात तोडगा निघाला नाही आणि या दोन्ही शिक्षकांना आत्महत्येचा मार्ग निवडावा लागला आहे. त्यामुळे नांदेड जिल्हा परिषदेचा शिक्षण विभाग पुन्हा एकदा चर्चेला आला आहे.

## निसर्गाच्या कुशीतील जागृत देवस्थान- श्रीक्षेत्र गंगनबीड महादेव मंदिरात श्रावणात भाविकांची अलोट गर्दी

**नांदेड (प्रतिनिधी)**– निसर्गाच्या कुशीत असलेल्या पुरातनकालीन श्रीक्षेत्र गंगनबीड येथील शिवपार्वती एकच असलेल्या महादेव मंदिरात पहिल्या श्रावण सोमवारनिमित्त भाविकांच्या दर्शनासाठी अलोट गर्दी होत असल्याची माहिती आहे. दरम्यान, येथे मंदिर प्रशासनाकडून भाविकांच्या सोयीसाठी जय्यत तयारी केली गेली असली तरी ती अपुरी पडत असल्याची चर्चा सर्वत्र होताना दिसत आहे.

नांदेड- हैदराबाद या राष्ट्रीय महामार्गावर कुंडूर फाट्यापासून दक्षिणेस २ किमी अंतरावर निसर्गरम्य वातावरणात उंच टेकडीवर असलेल्या श्रीक्षेत्र गंगनबीड येथे शिंगणापूर महादेवाचे प्रतिरूप समजले जाणारे गंगनबीड महादेव मंदिर हे पुरातनकालीन आहे. एका गुहेत सापडलेल्या महादेव मंदिरात दर सोमवारी दर्शनासाठी पंचक्रोशीतून भाविक येतात, पण श्रावण सोमवारच्या निमित्ताने महाराष्ट्रासह तेलंगणा, आंध्रप्रदेश, कर्नाटकातून भाविक मोठ्या प्रमाणात मध्यरात्रीच्या महाअभिषेकानंतर दर्शन घेण्यासाठी रांगा लावतात.

या मंदिराचा जीर्णोद्धार माजी आमदार स्व. बळवंतराव चव्हाण, माजी खा. भास्करराव खतगावकर यांच्या प्रयत्नातून झाला. नंतरच्या काळात माजी खासदार स्व. गंगाधरराव कुंटूरकर, माजी आमदार स्व. गंगाराम ठक्करवाड, माजी खासदार तथा विद्यमान आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या स्थानिक विकास योजनेअंतर्गत विकास करण्यात आला. तद्नंतर शासनाकडे श्रीक्षेत्र 'दर्जा' म्हणून दिवंगत खासदार स्व. वसंतराव चव्हाण यांच्या प्रयत्नाने मान्यता मिळाली. या भागाचे विद्यमान आमदार राजेश पवार यांच्या माध्यमातून या डोंगरकुशीतून मंदिराला जाण्यासाठी पक्के रस्ते, सभागृह, सभामंडप आदी विविध कामांसाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करण्यात आल्याने परिसरात सुधारणा झाली आहे. पावसाळ्यात आसपासच्या पहाडी भागात हिरवीगार झाडे-झुडपे



यांनी परिसर शोभून दिसतो, तर हरीण, काळवीट, मोर सदैव संचार करीत असल्याने येणाऱ्या असंख्य भाविकांना भुरळ पडते.

श्रीक्षेत्र गंगनबीडचा महादेव नवसाला पावणारा समजला जातो. या भागातील भाविक शिंगनापूर महादेवाला न जाता प्रतिरूप शिंगनापूर समजून येथेच नतमस्तक होत असतात, अशी माहिती देवस्थानचे मुख्य पुजारी भागवत अप्पा स्वामी यांनी दिली. या ठिकाणी श्रावण सोमवारी जत्रेचे स्वरूप प्राप्त होते. दर सोमवारी नवसाला पावणाऱ्या भक्ताच्या वतीने भंडारे (महाप्रसाद) करण्यात येतात. हजारो भाविक या महाप्रसादाचा लाभ घेतात. सदरील मंदिराकडे शासनाने श्रीक्षेत्राचा निधी मोठ्या प्रमाणात उपलब्ध करून परिसराचा कायापालट करावा, अशी मागणी पंचक्रोशीतून होत आहे. नायगाव पोलीस व मंदिर प्रशासनाच्या वतीने भाविकांच्या सुरक्षेसाठी चोख बंदोबस्त ठेवला जातो.


**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com